POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२३६ ● मुंबई, सोमवार, ३० मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

राज्यात पीएनजी नेटवर्क वाढीसाठी केंद्र शासनाकडून तांत्रिक सहाय्य तसेच पायाभूत सुविधा उभारणीसाठी आर्थिक पाठबळ आवश्यक - मंत्री छगन भुजबळ

■दिल्ली। प्रतिनिधी,

पीएनजी नेटवर्कचा राज्यभर विस्तार अधिक वेगाने करण्यासाठी केंद्र शासनाकडून तांत्रिक सहाय्य तसेच पायाभूत सुविधा उभारणीसाठी आर्थिक पाठबळ आवश्यक असल्याचे राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी आज विज्ञान भवन नवी दिल्ली येथे निवासी व व्यावसायिक आस्थापनांना एलपीजी व पीएनजी गॅसचा अधिक चांगला व सुलभ पुरवठा उपलब्ध करून देणे, तसेच निश्चित कालावधीत पीएनजी सेवांचा विस्तार करणेबाबत मा.ना.श्री.मनोहर लाल खट्टर केंद्रीय मंत्री,शहरी विकास व गृहनिर्माण तसेच मा.ना.श्री हरदीप सिंग पुरी,केंद्रीय मंत्री,पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली आयोजीत बैठकीत सहभाग नोंदविला. स्वच्छ इंधनाच्या उपलब्धतेत वाढ तसेच पाइपद्वारे नैसर्गिक वायू नेटवर्कच्या विस्तारासंदर्भात या बैठकीत चर्चा झाली. यावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी विविध सूचना या बैठकीत मांडल्या.

यावेळी केंद्रीय अन्न, नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी, हरियाणा, दिल्ली,उत्तरप्रदेश चे नगरविकास आणि अन्न नागरी पुरवठा मंत्री,केंद्रीय सचिव तसेच राज्याचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर आणि विविध महानगरपालिका आयुक्त,नैसर्गिक वायू कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते.



इमारतींना ओसी देण्यापूर्वी पीएनजी जोडणी अनिवार्य करा -भुजबळ

येत्या तीन महिन्यांनंतर एलपीजी पुरवठ्यात अडथळे येऊ शकतात, अशा सूचना केंद्राकडून मिळाल्या आहेत त्यामुळे आगामी काळात घरगुती गॅस (एलपीजी पुरवठ्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती लक्षात घेता, राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी 'पाईप्ड नॅचरल गॅस' (पीएनजी) जोडणीचा विस्तार वेगाने करण्याचे निर्देश दिले आहेत. इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) देण्यापूर्वी पाणी आणि विजेप्रमाणेच पीएनजी जोडणी अनिवार्य करावी, अशी सूचना भुजबळ यांनी केंद्र सरकारला केली आहे. दिल्ली येथे केंद्रीय मंत्र्यांसोबत झालेल्या महत्त्वाच्या बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. भुजबळ यांनी स्पष्ट केले की, पीएनजी पाईपलाइन टाकण्यासाठी लागणाऱ्या मंजुरीची प्रक्रिया आता अत्यंत वेगवान केली जाईल. विविध विभागांकडून मिळणाऱ्या परवानग्या आता २४ तासांच्या आत 'डीम्ड' (मान्यता मिळालेली) समजल्या जातील ज्यामुळे कामात कोणताही विलंब होणार नाही.

या बैठकीत मंत्री छगन भुजबळ यांनी विविध मुद्दे उपस्थित केले. ते म्हणाले की,"एलपीजी विस्तार जलदगतीने व्हावा यासाठी नवीन गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये एलपीजी सुविधा अनिवार्य करावी, जुन्या वसाहतींमध्ये जोडणीसाठी विशेष मोहिमा राबवाव्यात,व्यावसायिक आस्थापनांसाठी सुलभता हॉटेल, रेस्टॉरंट व लघुउद्योगांसाठी ढठऋ वापर वाढविणे गरजेचे आहे,यामुळे खर्च कमी होऊन पर्यावरणपूरक पर्याय उपलब्ध होतो तसेच परवाना व जोडणी प्रक्रिया सुलभ करावी* अशा सूचना केल्या. त्याचबरोबर महाराष्ट्रात शहर गॅस वितरण प्रकल्पांची अंमलबजावणी गतीमान करण्यासाठी राज्य शासनाने परवानगी प्रक्रिया अधिक सुलभ व गतिमान केली असून, व्यवसाय सुलभतेला चालना दिली आहे. तसेच, विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमधील दरांचे मानकीकरण करून प्रकल्पांच्या अंमलबजावणीस आवश्यक ती गती दिली जात आहे. पीएनजी नेटवर्कचा राज्यभर विस्तार अधिक वेगाने करण्यासाठी केंद्र शासनाकडून तांत्रिक सहाय्य तसेच पायाभूत सुविधा उभारणीसाठी आर्थिक पाठबळ आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

महाराष्ट्रातील सर्व शहरांमध्ये पीएनजी नेटवर्क विस्तारासाठी विशेष आर्थिक तसेच पायाभूत सहाय्य देण्यात यावे, ज्यायोगे प्रकल्पांची व्यवहार्यता वाढेल व घरगुती जोडण्यांचा विस्तार वेगाने होईल. तसेच पीएनजी पाइपलाइन विस्तारासाठी आवश्यक मंजुरी प्रक्रिया केंद्रीय संस्थांकडून अधिक समन्वयाने व वेळेत पूर्ण करण्यात यावी व वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर व्यावसायिक वापरासाठी एलपीजीचे वाटप वाढविण्यात यावे अशी मागणी त्यांनी केली.

त्याचबरोबर महाराष्ट्र शासन स्वच्छ इंधनाच्या प्रसारासाठी ठोस व परिणामकारक पावले उचलत असून, या उद्दिष्टांच्या वेळबद्ध व प्रभावी पूर्ततेसाठी केंद्र शासनाचे सातत्यपूर्ण सहकार्य अपेक्षित आहे. तसेच, राज्य शासनाकडून घरगुती एलपीजीचा १०० टक्के पुरवठा आणि व्यावसायिक एलपीजीचा पुरवठा केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार निर्धारित कोट्याप्रमाणे सुरळीतपणे सुनिश्चित केला जात असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

तसेच केंद्र शासनाच्या निदेर्शानुसार राज्यभरात City Gas Distribution नेटवर्कच्या जलद व वेगवान विस्ताराकरीता सूचना देण्यात आलेल्या आहे. त्यानुसार सीजीडी पाइपलाईन टाकण्याकरीता विविध महानगरपालिका/नगरपरिषदा, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंपदा विभाग आणि अन्य प्राधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या परवानग्या मंजूर समजण्यात याव्यात. विविध महानगरपालिका/नगर परिषदा, स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत नवीन सीजीडी परवानग्या २४ तासांत मंजूर करण्यात याव्यात. सीजीडी विस्ताराकरीता राज्य शासन / स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडून रस्ते पुर्ववत करण्याकरीता तसेच विविध परवानग्या देण्याकरीता आकारण्यात येणारे शुल्क माफ करण्यात यावे अशा मार्गदर्शक सूचना राज्य शासनाने कालच शासन निर्णयानुसार दिल्या आहे.

सीजीडी संस्थांना ज्या ठिकाणी शक्य असेल त्या ठिकाणी स्वत:च्या खर्चाने सार्वजनिक मालमत्ता पूर्ववत करण्याकरीता संमती देण्यात यावी. सदर पुनर्स्थापना विहीत दर्जाची होण्याकरीता सीजीडी संस्थांकडून आवश्यक ते हमीपत्र घेण्यात यावे. ज्या ठिकाणी सीजीडी संस्थांना स्वत:च्या खचार्ने सार्वजनिक मालमत्ता पूर्ववत करुन देणे शक्य नसेल त्या ठिकाणी केंद्र शासनामार्फत दि. २४ मार्च, २०२६ रोजीच्या अधिसूचनेमध्ये विहित केलेले शुल्क भरुन घेण्यात यावेत. सीजीडी संस्थांना २४ तास काम करण्याची परवानगी राहील. सीजीडी संस्थांकरीता कामकाजाचा हंगाम शिथिल करण्यात येत आहे. सीजीडी संस्थांना पाईपलाईन टाकणे, खोदणे, पूर्ववत करण्यासंदर्भात मुख्य अग्निशमन अधिकारी/वाहतूक पोलीस यांच्याकडून परवानग्या/एनओसी ची आवश्यकता राहणार नाही. सीजीडी संस्थांनी त्यांना करावयाच्या कामाची कार्यक्षेत्र निहाय दैनिक यादी संबंधित मुख्य अग्निशमन अधिकारी/वाहतूक पोलीस यांना माहितीस्तव उपलब्ध करुन द्यावी. सीजीडी जाळ्याच्या विकासाकरिता विविध विभागामध्ये प्रशासकीय सहकार्य व समन्वय वाढवण्याकरीता नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा यांना महाराष्ट्र राज्याकरिता नोडल अधिकारी घोषित करण्यात येत आहे. सदर आदेश हे ३० जून, २०२६ पर्यंत अंमलात राहतील असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत असल्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी नमूद केले.

मुंबईकरांसाठी मोठी दिलासादायक! दोन नव्या मेट्रो मार्गिका अखेर सेवेत

■मुंबई। प्रतिनिधी,

अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या मेट्रो प्रकल्पांबाबत अखेर मोठा निर्णय घेण्यात आला आहे. दहिसर ते मिरा-भाईंदर मेट्रो ९ आणि अंधेरी पश्चिम ते मंडाले (मानखुर्द) मेट्रो २बी या दोन महत्त्वाच्या मार्गिकांच्या पहिल्या टप्प्यांचे लोकार्पण आता निश्चित झाले असून, येत्या ३ एप्रिलपासून या मार्गांवर मेट्रो धावणार आहे.

प्रवाशांची प्रतीक्षा अखेर संपली

दोन्ही मार्गिकांचे काम पूर्ण होऊनही उद्घाटन रखडल्याने प्रवाशांना सेवेचा लाभ घेता येत नव्हता. मात्र आता या दोन्ही टप्प्यांना हिरवा कंदील मिळाल्याने प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. मेट्रो ९ अंतर्गत दहिसर ते काशीगाव, तर मेट्रो २बी अंतर्गत डायमंड गार्डन ते मंडाले या टप्प्यांवर सेवा सुरू होणार आहे.

राजकीय आणि प्रशासकीय कारणांमुळे उशीर

या मार्गिकांना सुरक्षा प्रमाणपत्र मिळूनही काही महिन्यांपासून उद्घाटन लांबणीवर पडले होते. निवडणूक आचारसंहिता आणि इतर प्रशासकीय कारणांमुळे हा विलंब झाला असून अखेर आता ३ एप्रिल रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांचीही हा उदघाटनाला उपस्तिथी असणार आहे.



मुंबईच्या मेट्रो नेटवर्कला मोठी भर

या दोन्ही मार्गिका सुरू झाल्यानंतर मुंबईतील कार्यरत मेट्रो मार्गिकांची संख्या सहा होणार आहे. विशेष म्हणजे, मेट्रो ९ च्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यालाही पहिल्यांदाच मेट्रो सेवा मिळणार आहे.

बीकेसीसाठी 'पॉड टॅक्सी' प्रकल्पाचीही घोषणा

याच कार्यक्रमात बीकेसीतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वाच्या 'पॉड टॅक्सी' प्रकल्पाचे भूमिपूजनही होणार आहे. वांद्रे पूर्व ते कुर्ला दरम्यान सुमारे ८.८ किमी लांबीचा हा प्रकल्प उभारला जाणार असून, भविष्यातील शहरी वाहतुकीसाठी हा मोठा टप्पा मानला जात आहे.

नवीन मेट्रो मार्गिकांमुळे पश्चिम उपनगर आणि पूर्व मुंबईदरम्यानचा प्रवास अधिक जलद, सोयीस्कर आणि किफायतशीर होणार आहे. त्यामुळे रोजच्या प्रवाशांना वाहतूक कोंडीपासून मोठा दिलासा मिळणार आहे.

नालासोपाऱ्यात सीएनजी पंप सील

किलोमागे ५० रुपये जादा वसुलीचा भंडाफोड, अधिकाऱ्याला धमकावण्याचा प्रयत्न

■वसई। प्रतिनिधी,

नालासोपारा पूर्व येथील धानिवबाग परिसरातील गुजरात सीएनजी पंपावर जादा वसुलीचा रॅकेट उघडकीस आल्यानंतर प्रशासनाने मोठी कारवाई करत हा पंप सील केला आहे. रिक्षाचालकांकडून प्रति किलो सीएनजीवर ३० ते ५० रुपये अधिक आकारले जात असल्याचे तपासात समोर आले आहे.

रिक्षाचालक बनून छापा; जादा वसुली रंगेहात पकडली

वसई तहसील कार्यालयातील अन्न व नागरी पुरवठा विभागाचे निरीक्षण अधिकारी भागवत सोनार यांनी मिळालेल्या तक्रारींच्या आधारे २७ मार्च रोजी दुपारी छापा टाकला. यावेळी ते रिक्षाचालकाच्या वेशात पंपावर पोहोचले होते. तपासणीदरम्यान कर्मचारी बलदेव यादव हा प्रति किलो ५० रुपये जादा आकारताना रंगेहात पकडला गेला.

रॅकेटचा पर्दाफाश

प्राथमिक चौकशीत पंपावरील कर्मचारी नियमितपणे प्रत्येक व्यवहारात ३० ते ५० रुपये अतिरिक्त वसूल करत असल्याचे समोर आले. ही रक्कम कर्मचारी, व्यवस्थापक आणि मालकांमध्ये वाटली जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.



अधिकाऱ्याला घेराव, धक्काबुक्की

या गैरप्रकाराबाबत जाब विचारल्यानंतर परिस्थिती तणावपूर्ण झाली. व्यवस्थापक सुरेश मिश्रा आणि इतर कर्मचाऱ्यांनी सोनार यांना घेराव घालून बाहेर जाण्यापासून रोखले तसेच धक्काबुक्की केल्याचा आरोप आहे. या गोंधळाचा फायदा घेत आरोपी बलदेव यादव घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न करत होता.

पोलिसांची तत्काळ कारवाई

सोनार यांनी पेल्हार पोलिसांना माहिती दिल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अधिकाऱ्याची सुटका केली. पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या कर्मचाऱ्याला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून ९६० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली.

गुन्हा दाखल... तपास सुरू

या प्रकरणी मालक समरनाथ पांडे, व्यवस्थापक सुरेश मिश्रा तसेच कर्मचारी बलदेव यादव, राजू खरख, संदीप शर्मा, सुनीता आणि इतरांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम १३२, १२१(१), १२१(२) तसेच अत्यावश्यक वस्तू कायद्याच्या कलम ३ आणि ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पंप सील... पुढील तपास सुरू

सध्या संबंधित सीएनजी पंप सील करण्यात आला असून हा गैरप्रकार किती काळ सुरू होता आणि आणखी कोणाचा यात सहभाग आहे का, याचा तपास पेल्हार पोलिसांकडून सुरू आहे.

राज्यात मेघगर्जनेसह वादळी पावसाचा इशारा... शेतकऱ्यांना सतर्कतेचे आवाहन



■मुंबई। प्रतिनिधी,

राज्यातील वातावरण पुन्हा एकदा बदलण्याची चिन्हे दिसत असून, हवामान खात्याने ३० मार्च ते ४ एप्रिलदरम्यान वादळी पावसाचा इशारा दिला आहे. या कालावधीत मेघगर्जनेसह पाऊस, विजांचा कडकडाट, जोरदार वारा आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे.

कोणत्या भागांना बसणार फटका?

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील घाट परिसरात या बदलत्या हवामानाचा सर्वाधिक परिणाम जाणवू शकतो. ३० मार्चपासून दुपारनंतर ढगाळ वातावरण होऊन वादळी पावसाची शक्यता आहे. काही ठिकाणी विजांचा कडकडाट आणि जोरदार वाऱ्यांसह पाऊस पडू शकतो.

३१ मार्चला थोडा दिलासा, पण अस्थिरता कायम

३१ मार्च रोजी पावसाचा जोर काहीसा कमी होण्याची शक्यता असली, तरी वातावरण पूर्णपणे स्थिर राहणार नाही. काही भागांत हलका वादळी पाऊस सुरू राहू शकतो.

१ ते ४ एप्रिलदरम्यान पुन्हा पावसाचा जोर वाढणार

हवामान विभागाच्या माहितीनुसार, १ ते ४ एप्रिलदरम्यान पुन्हा वादळी पावसाचा प्रभाव वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे या काळात विशेष सतर्कता बाळगणे गरजेचे आहे.

शेतकऱ्यांसाठी महत्वाची सूचना

सध्या रब्बी पिकांची कापणी सुरू असल्याने शेतकऱ्यांना विशेष इशारा देण्यात आला आहे. कापणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. जोरदार वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीट यामुळे पिकांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे शेतकऱ्यांनी आधीच आवश्यक ती खबरदारी घेऊन नुकसान टाळण्याचा प्रयत्न करावा.

अर्धवट जळालेल्या 'त्या' मृतदेहाचं गूढ उकललं

पहिला गळा आवळला अन् मृतदेह जाळून....

■यवतमाळ। प्रतिनिधी,

जोडमोहा शिवारातील तासलोट जंगलात १५ दिवसांपूर्वी एका २६ वर्षीय तरुणीचा अर्धवट जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळला होता. या खळबळजनक प्रकरणाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेने अत्यंत कौशल्याने पूर्ण केला असून, मुख्य आरोपी सतीश रमेश कश्यप याला बेड्या ठोकल्या आहेत. तपासात धक्कादायक माहिती समोर आली असून, अनैतिक संबंध आणि संशयावरून ही निर्घृण हत्या करण्यात आल्याचे निष्पन्न झाले आहे. सुरुवातीला मृतदेहाची ओळख पटवणे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. मात्र, स्थानिक गुन्हे शाखेने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषण यांच्या आधारे सतीशला ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने आपला गुन्हा कबूल केला. या गुन्ह्यात त्याला साथ देणारा त्याचा भाऊ (विधी संघर्ष बालक) याचाही सहभाग उघड झाला आहे. पोलिस प्रशासनाचा इशाराः संशयासारख्या क्षुल्लक कारणावरून होणाऱ्या गुन्ह्यांवर पोलीस यंत्रणा कडक नजर ठेवून असून, अशा प्रकरणांत कुणाचीही गय केली जाणार नाही.



नेमकी घटना काय?

मृत तरुणी, राणी किशोर वानखडे, ही पतीपासून विभक्त राहत होती. तिचे आरोपी सतीश कश्यप याच्याशी प्रेमसंबंध होते. मात्र, राणीचे इतर व्यक्तींसोबतही संबंध असल्याचा संशय सतीशच्या मनात बळावला होता. याच रागातून सतीशने तिला यवतमाळला भेटायला बोलावले. त्यानंतर तिला दुचाकीवरून निर्जन अशा तासलोट जंगलात नेले. तिथे दोघांमध्ये वाद झाला आणि सतीशने राणीचा गळा आवळून तिचा जीव घेतला. हत्या केल्यानंतर गुन्ह्याचा कोणताही पुरावा मागे राहू नये, यासाठी सतीशने आपल्या अल्पवयीन भावाच्या मदतीने मृतदेहावर पेट्रोल ओतून तो जाळण्याचा प्रयत्न केला. मृतदेह अर्धवट जळालेल्या स्थितीत जंगलात सोडून दोघेही पसार झाले होते.

दुबईतील युद्धसदृश परिस्थितीला घाबरून मुंबईत परतला, पण विमानतळाबाहेरच बनावट पोलिसांनी लुटले

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईत पोलिसांचे सोंग घेऊन लोकांना लुटण्याच्या घटना वारंवार घडताना दिसत आहेत. कुल्यार्चा रहिवासी असलेला 28 वर्षीय बबलू फक्रुद्दीन खान हा दोन महिन्यांपूर्वीच कामानिमित्त दुबईला गेला होता. मात्र दुबईमध्ये निर्माण झालेल्या युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे त्या परिस्थितीला घाबरून बबसू खान हा मुंबईतला परतला. मात्र विमानतळावरून आपल्या घरी जात असताना विमानतळाच्या परिसरात पोलिसांचे सोंग घेतलेल्या गुन्हेगारांनी त्याला लुटले आणि घटनास्थळावरून पळ काढला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बबलू फक्रुद्दीन खान हा कुर्ला पूर्व येथील नेहरू नगर भागात आपल्या कुटुंबासह राहतो आणि समोसे बनवण्याचे काम करतो. आपल्या कुटुंबाच्या उदरनिवार्हासाठी जानेवारी 2026 मध्ये तो कामाच्या निमित्ताने दुबईला गेला होता. मात्र, तिथे तणावपूर्ण आणि युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने घाबरलेल्या बबलू खान याने भारतात परतण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार 26 मार्च रोजी सकाळी 9 च्या सुमारास तो मुंबई विमानतळावर पोहचला. विमानतळाबाहेर पडल्यानंतर सकाळी 10 च्या सुमारास त्याने आपल्या घराच्या दिशेने जाण्यासाठी रिक्षाने प्रवास सुरू केला. सुमारे पाच मिनिटांनंतर



जेव्हा त्याची रिक्षा साकीनाक्याच्या दिशेने जाणाऱ्या 'जे.डब्ल्यू. मॅरियट' हॉटेलजवळ पोहोचली, तेव्हा काळ्या रंगाच्या 'स्प्लेंडर' मोटरसायकलवरून आलेल्या दोन व्यक्तींनी त्याची रिक्षा थांबवली.

मोटरसायकलवर मागे बसलेली व्यक्ती बबलू खान प्रवास करत असलेल्या रिक्षात घुसली आणि त्याने स्वत:ची ओळख पोलीस अधिकारी म्हणून करून दिली. त्यानंतर त्याने बबलूची अंगझडती घेण्याचा आग्रह धरला. जेव्हा बबलूने त्या व्यक्तीकडे त्याचे ओळखपत्र मागितले, तेव्हा त्याने ते दाखवण्यास नकार दिला. मात्र सदर व्यक्ती पोलीस अधिकारी असल्याचा दावा करत असल्यामुळे बबलू खान घाबरून गेला आणि पोलिसाचे सोंग घेतलेल्या व्यक्तीच्या भुलथापांना बळी पडला. बबलू खान याने त्याच्याकडे असलेली 1,500 भारतीय रुपये आणि दुबईचे 2,000 युनिट्स चलन पोलिसाचे सोंग घेतलेल्या व्यक्तीच्या स्वाधीन केले. त्यानंतर त्या दोन्ही व्यक्तींनी बबलूची समजूत काढली आणि त्याला सांगितले की, तो त्याचे पैसे पोलीस ठाण्यातून परत मिळवू शकतो. त्यासाठी त्याला पोलीस ठाण्यात जावे लागेल. असे सांगून पोलिसांचे सोंग घेतलेले दोन्ही आरोपी त्यांच्या मोटरसायकल सुसाट वेगाने साकीनाक्याच्या दिशेने गेले. मात्र थोड्याच वेळानंतर बबलूच्या मनात शंकेची पाल चुकचुकली आणि त्याला त्याची फसवणूक झाल्याचे लक्षात आले. यानंतर त्याने पोलीस ठाणे गाठत फसवणुकीप्रकरणी गुन्हा दाखल केला. यानंतर आजूबाजूच्या परिसरातून प्राप्त झालेल्या सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला आहे.

उजव्या हाताच्या बोटात वेदना, डॉक्टरांनी केले डाव्या हाताच्या बोटाचे ऑपरेशन... उपजिल्हा रुग्णालयातील प्रकार

■पंढरपूर। प्रतिनिधी,

पंढरपूरातील उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांच्या हलगर्जीपणाचा एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका 6 वर्षीय चिमुरड्याच्या उजव्या हाताच्या सहाव्या बोटाचे ऑपरेशन करायचे असताना, डॉक्टरांनी चक्क त्याच्या डाव्या हाताचे सुस्थितीत असलेले बोट कापल्याचा खळबळजनक आरोप पालकांनी केला आहे. या घटनेमुळे संपूर्ण वैद्यकीय क्षेत्रातून संताप व्यक्त केला जात असून सरकारी रुग्णालयांच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.



प्रशासनाकडून चौकशीचे आदेश

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून उपजिल्हा रुग्णालय प्रशासनाने तातडीने चौकशीचे आदेश दिले आहेत. दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी पीडित कुटुंबाने केली आहे. एका लहान मुलाच्या भविष्याशी खेळणाऱ्या या हलगर्जीपणामुळे सामान्य जनतेमध्ये भीतीचे आणि अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. आता या चौकशीतून काय निष्पन्न होते आणि दोषी डॉक्टरांवर प्रशासन काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ऑपरेशन थिएटरमध्ये अक्षम्य चूक

शाहू सुनील दंदाडे असे या दुर्दैवी बालकाचे नाव आहे. शाहूला जन्मजात दोन्ही हातांना सहा-सहा बोटे होती. त्याच्या उजव्या हाताच्या अतिरिक्त बोटामुळे त्याला प्रचंड वेदना होत होत्या, त्यामुळे त्याचे पालक त्याला उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात घेऊन आले होते. डॉक्टरांनी शस्त्रक्रियेचा सल्ला दिला खरा, मात्र प्रत्यक्ष ऑपरेशन थिएटरमध्ये डॉक्टरांकडून अक्षम्य चूक झाली. उजव्या हातातील त्रासदायक बोट काढण्याऐवजी डॉक्टरांनी डाव्या हाताचे निरोगी बोट कापून टाकले, असा आरोप नातेवाईकांनी केला आहे.

पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न

शस्त्रक्रिया आटोपल्यानंतर जेव्हा पालकांनी मुलाला पाहिले, तेव्हा त्यांना हा गंभीर प्रकार लक्षात आला. यामुळे संतप्त झालेल्या नातेवाईकांनी रुग्णालय परिसरात मोठा गोंधळ घातला. इतकेच नव्हे तर, आपली चूक लपवण्यासाठी आणि पुरावे नष्ट करण्यासाठी संबंधित डॉक्टरांनी कागदपत्रांमध्ये फेरफार केल्याचा गंभीर आरोपही पालकांनी केला आहे. या प्रकारामुळे रुग्णालयात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.




संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

इच्छामरण आणि जनहित!

मुंबई महानगरपालिकेकडे इच्छामरणासाठी ८५ अर्ज आले असल्याचे वृत्त नुकतेच प्रसारित झाले. मुंबईमध्ये मागील काही मासांपासून इच्छामरणासाठी येणाऱ्या अर्जांमध्ये वाढ होत असल्याचे या वृत्तामध्ये नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे इच्छामरणासाठी अर्ज करर्णाया बहुतांश व्यक्तींना कोणत्याही गंभीर स्वरूपाच्या व्याधी नाहीत; परंतु भविष्यात अशा प्रकारच्या व्याधी निर्माण झाल्यास मृत्यू सुकर व्हावा, या भावनेतून बहुतांश जणांनी हे अर्ज केले आहेत. महाराष्ट्रातील अन्य जिल्हे, तसेच भारतातील विविध राज्ये यांतील इच्छामरणासाठी अर्ज करर्णायांची नेमकी आकडेवारी उपलब्ध नाही; परंतु मुंबईमध्ये जी स्थिती आहे, तशी स्थिती न्यून-अधिक प्रमाणामध्ये महाराष्ट्रात आणि देशातही असण्याची शक्यता नाकारता येत नाही. २४ मार्च या दिवशी हरिश राणा यांचा देहली येथील एका रुग्णालयात इच्छामरणाद्वारे मृत्यू झाला. न्यायालयाने इच्छामरणासाठी अनुमती दिलेले भारतातील हे पहिलेच उदाहरण आहे. चंडीगड येथे रहात्या घराच्या चौथ्या मजल्यावरून पडल्यामुळे हरिश राणा यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती आणि ते १३ वर्षांपासून कोमात (बेशुद्धावस्थेत) होते. औषधोपचाराला प्रतिसाद देत नसल्यामुळे आणि वेदना पाहू शकत नसल्यामुळे त्यांच्या वडिलांनी सर्वोच्च न्यायालयाकडे इच्छामरणासाठी याचिका केली होती. सर्वोच्च न्यायालयाने त्यांना यासाठी अनुमती दिली. यामध्ये व्यक्तीचे उपचार आणि अन्न बंद करून त्याला मृत्यूकडे नेले जाते. हरिश राणा यांच्याप्रमाणे दुर्धर व्याधींनी ग्रस्त असलेल्या व्यक्तींनी इच्छामरणासाठी अर्ज करणे, हे समजण्यासारखे आहे; परंतु कोणतीही व्याधी नसलेल्या नागरिकांनी भविष्यातील संभाव्य धोक्याच्या काळजीने इच्छामरणासाठी अर्ज करायचा, तर सरकारला याविषयी निश्चितच एक धोरण ठरवावे लागेल. ज्याप्रमाणे भविष्यात अपघात झाल्यास आर्थिक प्रावधान म्हणून जीवनविमा काढला जातो, त्याचप्रमाणे व्याधीग्रस्त झाल्यास वेदना वाट्याला येऊ नयेत, यासाठीची उपाययोजना आधीच करून ठेवण्याचा या लोकांचा मानस दिसतो. यापूर्वी वर्ष १९७३ मध्ये मुंबईतील 'केईएम्' रुग्णालयात परिचारिका म्हणून काम करत असलेल्या अरुणा शानबाग यांच्यावर स्वच्छता कर्मचार्‍याने अत्याचार करून त्यांना ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. या अत्याचारात त्यांच्या मेंदूला अल्प रक्तपुरवठा झाल्याने त्या मरणासन्न स्थितीत गेल्या होत्या. जवळजवळ ३६ वर्षे त्या अशा अवस्थेत असल्यामुळे त्यांची मैत्रीण पिंकी विराणी यांनी अरुणा शानबाग यांच्या इच्छामरणासाठी याचिका केली होती; परंतु 'केईएम्' रुग्णालयातील अरुणा शानबाग यांच्या अन्य मैत्रिणींनी अरुणा त्यांना ओळखत असून प्रतिसाद देत असल्याचे सांगितले आणि त्यांची देखभाल करण्याचीही सिद्धता दर्शवली. त्यामुळे न्यायालयाने पिंकी विराणी यांची इच्छामरणाची याचिका अमान्य केली होती. पुढे वर्ष २०१५ मध्ये अरुणा शानबाग यांचा नैसर्गिक मृत्यू झाला. या प्रकरणानंतरच खर्‍या अर्थाने भारतात इच्छामरणाविषयी प्रथम चर्चा झाली होती. त्यामुळे इच्छामरणासाठी भविष्यात कोणत्या याचिका आल्यास त्याविषयी कोणता निर्णय घ्यावा? याची सुसूत्रता असणे आवश्यक होते. वर्ष २००५ मध्ये 'कॉमन कॉज' या सामाजिक संस्थेने सन्मानाने जगण्याच्या अधिकारांतर्गत इच्छामरणाला अनुमती असावी, यासाठी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका केली होती. या याचिकेवर वर्ष २०१८ मध्ये न्यायालयाने ऐतिहासिक निर्णय दिला. यामध्ये इंजेक्शन देऊन जीव घेण्याच्या इच्छामरणाला न्यायालयाने अनुमती नाकारली; परंतु दुर्धर व्याधीग्रस्त स्थितीत असलेल्या व्यक्तीला उपचार आणि अन्न बंद करून नैसर्गिक मृत्यूप्रमाणे इच्छामरणासाठी न्यायालयाने अनुमती दिली आहे. हरिश राणा यांना याच निर्णयाच्या आधारे इच्छामरणासाठी अनुमती देण्यात आली. इच्छामरणाला अनुमती देतांना न्यायालयाने काही अटी आणि बंधने घातली आहेत. सध्या तरी संसदेने याविषयीचा कायदा केलेला नाही, कारण यापूर्वी याविषयीचा कायदा करण्याची आवश्यकताच भासली नाही; परंतु सध्या इच्छामरणासाठी ज्या प्रकारे अर्ज येत आहेत, त्यांची संख्या पहाता भविष्यात याविषयीचे मार्गदर्शक धोरण निश्चित करावे लागेल. याविषयी सध्या अस्तित्वात असलेल्या राज्यघटनेवर आधारित कायदा करण्याला मयार्दा येऊ शकतात, ही वस्तूस्थिती आहे. जसे की, नुकतेच न्यायालयाने निर्णय दिलेल्या एका प्रकरणामध्ये विवाहित पुरुषाने 'लिव्ह इन रिलेशनशिप'मध्ये रहाणे, हा गुन्हा होत नसल्याचे नमूद केले आहे. हे कायद्याच्या चौकटीत बसत असले, तरी नैतिकतेमध्ये बसत नाही. महाराष्ट्रात मागील काही वर्षांत काही मंत्री आणि आमदार यांच्या विवाहबाह्य संबंधांची प्रकरणे अन् त्याचे व्हिडिओ सामाजिक माध्यमांवरून प्रसारित झाले. अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ते शिक्षेस पात्र ठरले नाहीत. ज्या समाजामध्ये ते मताधिक्याने निवडून आले आहेत, त्यांमधील सामाजिक मूल्ये आणि नैतिकता जपणे हे त्यांचे कर्तव्य आहे; परंतु कायदा अन् नैतिकता या दोन्ही भिन्न गोष्टी आहेत. त्या प्रत्येक वेळी समांतर असतीलच, असे नाही. त्यामुळे न्याय ज्या कायद्याच्या आधारे दिला जातो, तो कायदा मुळात नैतिकतेच्या आधारावर असणे, हेच समाजरचनेच्या दृष्टीने आवश्यक आणि हितकारी आहे. त्यामुळे इच्छामरणाचा निर्णयही केवळ अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या चौकटीमध्ये देण्यापेक्षा त्याची नैतिकतेची बाजू अर्थात् धर्मशास्त्राचा विचार करून होणे आवश्यक आहे. त्याविषयी धर्मशास्त्र काय सांगते? हे पहाणे महत्त्वाचे ठरते. सध्या अस्तित्वात असलेल्या न्यायव्यवस्थेमध्ये ब्रिटीशकालीन कायद्यांचा संदर्भ आणि इंग्लंडमधील निवाड्यांचा संदर्भ घेतला जातो; परंतु हिंदु धर्मशास्त्राचा विचार केला जात नाही, हे दुर्दैव आहे. धर्मनिरपेक्ष देशाची ही मयार्दा केवळ हिंदूंसाठीच नव्हे, तर समस्त मानवजातीसाठी घातक आहे. महाभारतामध्ये कुरुसभेत एका हत्येच्या गुन्ह्यात निवाडा देतांना दुर्योधनाने चारही जणांना मृत्यूदंडाची शिक्षा दिली; परंतु युधिष्ठिराने त्यांना त्यांच्या वर्णानुसार शिक्षा सुनावली. म्हणजेच अज्ञानी असलेल्या शुद्रापेक्षा ज्ञान असूनही गुन्हा करर्णाया उच्च वर्णियांना अधिक शिक्षा सुनावली. शिक्षेतील हा सूक्ष्मपणा केवळ आणि केवळ हिंदु धर्मशास्त्रांमध्येच आहे. मनुष्यजीवनाचे ईश्वरप्राप्तीच्या दृष्टीने महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यामुळे इच्छामरणासारख्या संवेदनशील विषयात न्यायदानासाठी धर्मशास्त्राचा आधार घेणे उचित ठरेल. हा प्रकार केवळ इच्छामरणापुरता मर्यादित नाही, तर लिव्ह इन रिलेशनशिप असो, आत्महत्या असो किंवा विवाहबाह्य अनैतिक संबंध असो, सध्याच्या कायद्यानुसार याचा सूक्ष्म विचार करण्याला मयार्दा आहेत, ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे भविष्यात न्यायदान हे आपल्या प्राचीन महान अशा हिंदु धर्मशास्त्रावर आधारित असणे आवश्यक वाटते!

बेरोजगारी? की व्यवस्थेची दिवाळखोरी!



देशात आज सुमारे ४० टक्के पदवीधर तरुण बेरोजगार आहेत. त्यात २० ते २९ वर्षे वयोगटातील ६.३ कोटी पदवीधरांपैकी १.१ कोटी तरुणांना रोजगार नाही. अर्थव्यवस्थेच्या फुगीर आकड्यांना टाचणी लावणारी ही आकडेवारी नुकतीच अझीम प्रेमजी विद्यापीठाच्या 'स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०२६' अहवालातून समोर आली. या समस्येचे कारणे आणि ती सोडवण्यासाठीचे दिशादर्शन.

काही गोष्टींची आपल्याला इतकी सवय होवून जाते की, त्या मोठ्या समस्या आहेत, त्यांचे गंभीर आणि दूरगामी परिणाम आहेत; पण त्या सोडविणे शक्य आहे, याची संवेदना आणि बुद्धीच हरवून जाते.याला 'सामान्यीकरण' किंवा इंग्रजीमध्ये 'नॉर्मलायझेशन' असे म्हणतात. उदाहरणार्थ भारतात प्रत्येक रिकाम्या आणि मोकळ्या जागेत कचऱ्याचे ढीग असणारच. लोकलमध्ये श्वास गुदमरेपर्यंत गर्दी असणारच इत्यादी.कोणत्याही समस्येपेक्षादेखील जास्त गंभीर गोष्ट असते, ती तिचे सामान्यीकरण.

तीच आता भारतात बेरोजगारीबाबत झाली आहे. विशेषतः पदवीधरांच्या बेरोजगारीबाबत.सध्या इराणवर अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या हल्ल्यामुळे सुरू असलेल्या युद्धपरिणामांची चर्चा सुरू आहे. युद्धामुळे भारताची निर्यात-आयात तसेच देशातील इंधनाच्या किंमती यावर अत्यंत विपरित परिणाम होतील, हे तर स्पष्ट आहे. त्यामुळे एकूणच औद्योगिक क्षेत्रातील मंदीची शक्यता असल्याने बेरोजगारीदेखील वाढेल, असे या समस्येचे सामान्यीकरण केले जाण्याची शक्यता आहे.

परंतु, देशातील बेरोजगारीची समस्या ही तत्कालिक नाही, किंबहुना ती मुख्य समस्या नसून एका मोठ्या व्यवस्थात्मक अरिष्टाचे लक्षणमात्र आहे, हे समजावून घ्यावे लागेल.असे का आणि कसे ते पाहू. त्यासाठी प्रथम ही बेरोजगारी कशाला म्हणतात आणि ती आहे तरी किती हे समजले पाहिजे.

इथे रोजगार याचा अर्थ, उत्पन्न मिळविण्याच्या अपेक्षेने पुरविलेली कोणतीही सेवा किंवा श्रम. त्यामध्ये नोकरी, व्यापार-उद्योगसंचालन, शेती इत्यादी सर्व प्रकारची कार्ये येतात. रिक्षावाल्यापासून ते सर्वोच्च व्यवस्थापकापर्यंत आणि पथारीवाल्यापासून ते मोठ्या उद्योगपतींपर्यंत सर्वांचा समावेश 'रोजगार असणारे' या सदरात होतो. बेरोजगार म्हणजे जे रोजगार शोधत आहेत, पण त्यांना तो काही विशिष्ट कालावधीपर्यंत मिळू शकत नाही, असे लोक. आता हा कालावधी किती समजला जातो, याची तांत्रिकता विस्तारभयास्तव बाजूस ठेवू. जर एखाद्याला रोजगार नसेल, आणि तो शोधतदेखील नसेल, तर त्याला बेरोजगार असे समजले जात नाही.

भारतामध्ये १५ ते ६५ हे काम करण्यायोग्य वय आहे. या वयातील संपूर्ण लोकसंख्येच्या संदर्भाने पाहिले, तर भारतात बेरोजगारीचे प्रमाण सुमारे ५.६ टक्के होते .(पीरिऑडिक लेबर फोर्स, सर्वे जून २०२५). मात्र त्याच वेळी १५ ते २९ या युवा वयोगटामध्ये १४ टक्के म्हणजे सुमारे ५ कोटी युवक बेरोजगार होते. हे आकडे अपवादात्मक नाहीत. वर्ष आणि महिना बदलला तरी या संख्येमध्ये फार तर अर्धा किंवा एक टक्क्याचा फरक पडू शकतो.

शिक्षणामुळे माणसाची रोजगारक्षमता वाढते, असे म्हणले जाते. जेवढे शिक्षण अधिक तेवढी बेरोजगारीची शक्यता कमी, असे वाटते. परंतु प्रत्यक्षात असे दिसते की, २० ते २९ वयोगटातील पदवीधरांचा विचार केला, तर त्यातील ४० टक्के पदवीधर बेरोजगार होते. या वयोगटातील एकूण बेरोजगार १०० समजले तर त्यातील ६७ टक्के बेरोजगार होते. सर्व आकडेवारीचा सारांश सांगायचा तर, युवा वयोगटात देशातील सुमारे २७ टक्के लोकसंख्या म्हणजेच ३७ कोटी लोक आहेत. भारतात विविध अहवालांनुसार सुमारे पाच कोटी युवा बेरोजगार आणि सुमारे १ कोटी १० लाख इतके पदवीधर बेराजगार २०२३ या वर्षात होते.

समस्येचे बदलते गंभीर स्वरूप

युवा वयोगटातील पदवीधरांमध्ये बेरोजगारांचे मोठे प्रमाण ही भारतातील गेली ४० वर्षे असणारी समस्या आहे, हे खरे. पण म्हणून त्याकडे दुर्लक्ष करणे अत्यंत धोकादायक आहे. कारण ती गेल्या काही वर्षांत संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या ही समस्या गंभीर स्वरूप धारण करते आहे. उदाहरणार्थ, १९८३ मध्ये एकूण युवा बेरोजगारांपैकी (२० ते २९ वयोगट), फक्त १३ टक्के बेरोजगार हे पदवीधर होते. तर तेच प्रमाण आज ६७ टक्के इतके झाले आहे. १९८३ मध्ये या बेरोजगार पदवीधरांपैकी बहुतेक पदवीधर हे समाजातील उच्च किंवा मध्यम उत्पन्नगटातील असल्याने ते पदवीनंतर त्यांना हवी असणारी संधी मिळेपर्यंत थांबू शकत होते, आता तसे नाही.

समाजातील तळाच्या स्तरापर्यंत उच्च शिक्षणाची संधी पोचल्यामुळे तेथून येणाऱ्या पदवीधरांची संख्या खूप वाढली आहे. शिवाय त्यावेळी पदवीपर्यंतचे शिक्षण हे सरकारी खर्चावर असल्याने स्वस्त होते. मात्र गेल्या २० वर्षांत माध्यमिक पासून उच्च शिक्षणापर्यंतच्या खासगीकरणामुळे शिक्षणावर गरीबांनादेखील कराव्या लागणाऱ्या खर्चामध्ये कित्येकपटींनी वाढ झाली आहे. त्यामुळे जे गरीब पदवीपर्यंत पोचून शिक्षण घेतात. त्यांना तात्काळ रोजगाराची नितांत गरज असते. पण या बहुतेक खासगी शिक्षणसंस्थांचा दर्जा अत्यंत खालावला आहे. त्यामुळे, तसेच आर्थिक व्यवस्थात्मक कारणांमुळे पदवीनंतर ४ वर्षे थांबूनदेखील त्यांना रोजगार मिळू शकत नाही. सामाजिक-मानसिकदृष्ट्या विचार केला, तर ही बाब अत्यंत दुःखदायक नव्हे तर चिंताजनक ठरते.

आता हे लक्षात घ्यावे लागेल की, बेरोजगारीची समस्या ही केवळ काही व्यक्तींची 'आर्थिक' समस्या नाही, केवळ युवकांची तर नाहीच नाही. देशासाठी ती सार्वत्रिक अरिष्टाची आणि सामाजिक अधःपतनाची सुरुवात आहे. युवकांना अर्थहीनतकडे नेणारी कोंडी आहे. कारण माणसाचे नागरिकत्व आणि मनुष्यत्व ज्या दोन गोष्टींनी निश्चित होते, त्यातील पहिली आहे शिक्षण आणि दुसरी आहे, रोजगाराची संधी.

ही तर आर्थिक दिवाळखोरी

भारतासारख्या देशाच्या दृष्टीने विचार केला तर बेरोजगारीची समस्या इतक्या मोठ्या प्रमाणावर आणि तीदेखील दीर्घकाळ असणे, याचा आपण देश म्हणून विचार केला, तर आपली सर्व व्यवस्था पूर्ण अपयशी ठरत असल्याचा निर्णायक पुरावाच आहे. बेरोजगारी ही आकाशातून पडलेली नैसर्गिक आपत्ती नाही. विकास शिक्षण आणि रोजगार हे सर्व घटक एकत्र न आणू शकणाऱ्या शासनाची आणि आर्थिक सामाजिक व्यवस्थेची ती निर्मिती आहे.

एका बाजूला किमान ७० टक्के लोकसंख्येच्या पिण्यायोग्य पाणी, अन्न वस्त्र निवारा, यादेखील गरजा पूर्ण होऊ शकत नाहीत. जगण्यायोग्य शहरे, गावे नाहीत. वने नामशेष होत आहेत. शहरात नद्यांची गटारे बनविली जात आहेत. तर ग्रामीण भागात त्या कोरड्या ठाक बनल्या आहेत. आरोग्य, शिक्षण इत्यादी किमान मानवी गरजांची पूर्तता होत नाही. मात्र दुसरीकडे सर्व जनतेच्या या गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेशी नैसर्गिक साधनांची उपलब्धता आहे. तिसरीकडे या नैसर्गिक साधनांवर काम करण्यासाठी मनुष्यशक्ती उपलब्ध आहे. पण तरीदेखील यांची सांगड आपण घालू शकत नाही. हीच या देशाची मुख्य समस्या आहे.

स्पर्धा परीक्षा-एक सामूहिक भानामती!

स्पर्धा परीक्षा म्हणजे शेकडो तहानलेल्या लोकांसाठी एक पाण्याचे पिंप आणि चार ग्लास ठेवून, त्यांची मजा बघण्याचा प्रकार आहे. १० लाख परीक्षार्थीमधून १००० जणांची निवड, म्हणजे १००० युवक युवतींमधून एकजण निवडणार. ही स्पर्धा नव्हे, संघटितपणे केलेली चेष्टाच आहे. गावाकडचे हजारो युवक युवती आपापल्या घरातील दोन-तीन एकराची जमीन गहाण ठेवून, परंपरागत घरे विकून कसे तरी पोट भरून, क्लासेसच्या एक एक लाख रुपयांच्या फीज भरत आहेत. या स्पर्धा परीक्षांमध्ये ३-४ वर्षे घालत आहेत. कोणी प्राथमिक परीक्षा उत्तीर्ण होऊन मुख्य परीक्षेतून परत आला, तर पुन्हा पायथ्यापासून सुरुवात करतो आहे. ९९९ जणांच्या पदरात अखेरीस काय? तर आपण अपात्र असल्याचा एक शिक्का. पाठीवर निराशेचे एक कुबड!! जे लपविता येत नाही आणि कशाचे आहे, हे उघडपणाने सांगतादेखील येत नाही.

ही परिस्थिती बदलण्यासाठी म्हणून काहींच्या मुठी वळतात खऱ्या, पण उंच आकाशापर्यंत आपले हात पोचत नाहीत, असे दिसले की, त्याच मुठींच्या मागची मनगटे चावत युवक-युवती निराश होऊन नशीबाला दोष देतात. किंवा द्वेषाचा कारखाना चालविणाऱ्या एखाद्या जाती-धर्माच्या संघटनेचे गिऱ्हाईक बनतात. फेसबुक सोशल मीडियावर जीव खाऊन, शिवीगाळ करून हिंसक लेखन करून आपल्या नैराश्याला वाट करून देतात.

विकास-शिक्षण-कौशल्य-रोजगार यांचा तुटलेला सांधा


देशातील सद्य परिस्थितीमध्ये मुख्य मुद्दा असा आहे की, शिक्षण, विकास आणि रोजगार या तीन प्रक्रियांचा कोणताही परस्पर समन्वयच घातला गेलेला नाही. त्यामुळे हे तीनही घटक आपापल्या दिशेने भटकत जात आहेत. सर्वांत पहिले म्हणजे विकासाची तर जबाबदारीच सरकारने खासगी क्षेत्रावर टाकली आहे. देशाचे आर्थिक नियोजन ही संकल्पनाच हद्दपार केली आहे. दुसरीकडे शिक्षण ही जणू काही एखादी बाजारात खरेदी करायची आणि उपयोग करून घेण्याची कपड्यासारखी खासगी वस्तू असल्याचे सरकारने ठरविले आहे. याला अनुसरून तेथे नफा तत्त्वावर बाजारीकरणाचे राज्य आहे. भारतातील विकास-शिक्षण-रोजगार यांच्या आवश्यक अशा सांध्याचा काहीही विचार न करता अत्यंत नियोजनशून्य तऱ्हेने आणि आता तर खासगी शिक्षणसम्राटांच्या सोयीने शिक्षणाचे हे वस्त्र विणले जात आहे. त्यावर परिस्थितीचे पाणी पडताच त्याचे पायपुसणे झालेले आहे. शिवाय एकूण शिक्षणाचा दर्जा चांगला नाही. विश्वासार्हदेखील नाही. भारतातील अभियांत्रिकी महाविद्यालयातून जे अभियंते बाहेर पडत आहेत, त्यांच्यापैकी बहुतेक पदवीधरांना आवश्यक ते तांत्रिक व्यावसायिक शिक्षणच मिळालेले नसते, असे मत औद्योगिक व्यवस्थापनांकडून व्यक्त केले जात आहे. तिसरीकडे रोजगार मिळणे ही देखील युवक किंवा विद्यार्थ्यांची खासगी जबाबदारी (नशीब) असल्याचे समजले गेले आहे. त्यामुळे त्याबाबत सरकारची कोणतीही जबाबदारीच नाही, अशी अधिकृत धारणा झाली आहे.

नव्या दृष्टिकोनाची गरज

बेरोजगारीची समस्या ही सर्वांत मोठी मानवी, आर्थिक आणि राजकीय समस्या आहे. बेरोजगारी ही आपल्या न वापरलेल्या क्षमतांची बेरीज असून, तिचा सांधा आपले पर्यावरण, नैसर्गिक संसाधने आणि मानवी-सामाजिक गरजांशी घालणे हे आव्हान आहे, अशा दृष्टीने त्याकडे पाहिले पाहिजे. असे पाहिले तर, समस्येचे रूपांतर क्षमतेमध्ये आणि निरुपायचे रूपांतर शक्यतेमध्ये झाल्याचे दिसून येईल. अशा दृष्टीने विचार करून देशाच्या संपूर्ण राजकीय अर्थव्यवस्थेचे जनकेंद्री पुनर्आखणी करावी लागेल. त्यासाठी सर्व परंपरागत पूर्वग्रह आणि संकुचित द्वेष-दंगे, भंपक दिखाऊ बनावट वादांच्या चिखलातून बाहेर पडून विचार करावा लागेल.

जातिभेद नष्ट करण्यास शोषकांचाच विरोध

देशात हिंदुत्वाचा डंका वाजत असताना या जातिभेदाचे बळी हे हिंदूच ठरत आहेत. तरीही जातिभेद नष्ट व्हावा अशी पुसटशी इच्छाशक्ती या शोषकांमध्ये दिसत नाही.



विद्यापीठातील जातिभेदाचे बळी, रोहित वेमूला आणि पायल तडवी यांच्या कुटुंबीयांनी केलेल्या अजार्नतर, मागास जातीच्या विद्यार्थ्यांवर विद्यापीठांमध्ये जातिभेदातून होणारे अत्याचार रोखले जावेत, समता सुनिश्चित होण्यासाठी नियम बनवावेत, या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार 'यूजीसी इक्विटी रेग्युलेशन २०२६' अस्तित्वात आले. त्यास खुल्या प्रवगार्तील विद्यार्थ्यांनी तीव्र विरोध केल्याने सर्वोच्च न्यायालयानेच त्या नियमांवर स्थगिती आणली आणि इथल्या शोषक वगार्चाच जातिभेद नष्ट करण्यास पराकोटीचा विरोध आहे, हे कटू वास्तव पुन्हा एकदा अधोरेखित झाले. हे विधान आणि लेखाचे शीर्षक कोणास अतिशयोक्त वाटू शकेल. परंतु, हे वास्तव नाकारता येत नाही की अनुसूचित जाती, जमातींना (आणि ओबीसींना देखील) न्याय, प्रतिनिधित्व देण्यासाठी, समता स्थापित करण्यासाठी जेव्हा सरकारद्वारा उपाय योजले जातात त्या प्रत्येक उपायास शोषक वर्ग प्रखर विरोध करतो किंवा सदोष अंमलबजावणी करून ते उपाय कुचकामी कसे ठरतील हे पाहतो. याची सुरुवात संविधान आल्यापासून आणि आरक्षण लागू झाल्यापासून झाली आहे. त्यावर एक दृष्टिक्षेप.

देशातल्या ब्राह्मणवादी व्यवस्थेत अनुसूचित जाती-जमातींच्या लोकांवर हजारो वर्षांपासून अमानवी अन्याय, अत्याचार केले जात आहेत याची जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंदोलनांनी देशाला आणि संविधान सभेला करून दिली होती. या अत्याचारपीडित लोकांना, न्याय, प्रतिनिधित्व, प्रतिष्ठा देण्यासाठी, समता स्थापित करण्याकडे एक पाऊल टाकण्यासाठी आरक्षण आले. परंतु जातिभेदाचा समाजावर लागलेला कलंक दूर करण्यासाठी या छोट्या संधीचा उपयोग करून घेण्याऐवजी शोषक वर्गाकडून यास प्रखर विरोध सुरू झाला.

संविधानाने आरक्षण दिले तरी ते राबवण्याची सूत्रे व्यवस्थेत ठाण मांडून बसलेल्या शोषक जातींच्या लोकांकडे होती आणि आहेत. मागास जातीच्या लोकांमध्ये गुणवत्ता असूच शकत नाही, असा ठाम गैरसमज करून घेऊन आणि या लोकांनी पायरीतच समरस होऊन राहिले पाहिजे यासाठी शक्य तिथे शोषक वर्गाने अडवणुकीचे धोरण राबवले. राखीव जागा न भरणे, मुलाखतीत किंवा मौखिक परीक्षेत कमीत कमी गुण देणे. लेखी परीक्षा, मुलाखत, नियुक्तीची पत्रे वेळेत पोहोचू शकणार नाहीत हे पाहणे, इत्यादी मागार्ने नोकरीत प्रवेश कठीण केला जातो. त्यातूनही जे कोणी नोकरी मिळवतील त्यांना अजिबात सहकार्य न करणे, योग्य मार्गदर्शन-प्रशिक्षण न देणे, एखाद्या प्रकरणात अडकवणे, वाईट गोपनीय अहवाल देणे आणि पदोन्नती मिळणार नाही हे पाहणे, यासाठी शोषक वर्ग बुद्धी आणि वेळ खर्च करीत आहे. गेल्या काही वर्षांत तर सरकारी क्षेत्राचे खासगीकरण, कंत्राटीकरण करून आणि आऊटसोर्सिंगच्या मागार्ने या क्षेत्रातील रोजगाराच्या संधीच नाममात्र करून ठेवल्या आहेत.

विशेष म्हणजे, हा भेदभाव या शोषकांनी चक्क परदेशात देखील स्थलांतरित करून देशाचे आणि धर्माचे नाव बदनाम केले. काही वर्षांपूर्वी अमेरिकेतील सिलिकॉन व्हॅलीत काम करणाऱ्या मागास जातींच्या सहकाऱ्यांचा शोषक जातीच्या सहकाऱ्यांनी छळ केल्याची अनेक प्रकरणे उजेडात येऊ लागली. त्यावेळी मागास जातीच्या लोकांना न्याय देण्यासाठी कॅलिफोर्निया राज्यावर, एक विधेयक मंजूर करून जातीवर आधारित भेदभाव हा बेकायदेशीर गुन्हा ठरवण्याची वेळ आली. विशेष म्हणजे अमेरिकेत नोकरीस जाणारे तरुण हे उच्च शिक्षित असतात, त्यांनी तिकडच्या अवघड प्रवेश परीक्षा पास केलेल्या असतात आणि गुणवत्तेत सरस ठरल्यावरच त्यांची निवड होते. तरीही शोषक जातीचे लोक जातीयता सोडत नाहीत.

सामाजिक जीवनात या मागास जातींच्या लोकांना जातिभेदामुळे वेळोवेळी अत्याचार सहन करावे लागतात. व्यवस्थेतल्या शोषकांकडून यावर न्याय मिळणे देखील दुरापास्त होते. म्हणून, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ पारित केला गेला. तर या कायद्याला देखील तो पारित झाल्यापासून आजतागायत विरोध केला जात आहे. कायद्याविषयी गैरसमज पसरवले जात आहेत. कायद्याचा दुरुपयोग होतो, तक्रार दाखल झाल्यास लगेच अटक होते, आयुष्य बरबाद होते असा गैरसमज पसरवला गेला. परंतु भीमा-कोरेगाव दंगलीच्या वेळी या कायद्याखाली तक्रार दाखल झालेल्या लोकांना अटक झाली नाही. अगदी गेल्या वर्षी कोथरूड येथे तर या कायद्याखाली एक प्रकरण नोंदवण्यास पोलिसांनी ठाम नकार दिला आणि केवळ कोर्टाच्या आदेशावरून प्रकरण दाखल झाले. पण अजून कोणालाही अटक झाली नाही. हा कायदा सौम्य किंवा निरुपयोगी ठरेल असे निर्णय न्यायालयांकडून वेळोवेळी येत आहेत. पुन्हा, या कायद्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार शोषक जातीच्या अधिकाऱ्यांकडेच असल्याने त्यांचा कल अशी प्रकरणे दडपण्याकडे किंवा न्यायालयात यशस्वी होऊ द्यायची नाहीत याकडे असतो. यामुळे अशा प्रकरणांत शिक्षा होण्याचा दर अत्यल्प असतो. म्हणून, ही प्रकरणे यशस्वी होत नाहीत म्हणजे ती खोटीच असतात असे नरेटीव्ह पसरवले जाते.

आता हे यूजीसी इक्विटी रेग्युलेशन २०२६ प्रकरण. या नियमांनुसार, मागास जातीच्या विद्यार्थ्याने भेदभाव झाल्याची तक्रार केल्यास ३० दिवसांत चौकशी करून कारवाई करणे तसेच इक्विटी अधिकारी नियुक्त करणे, तक्रार निवारण समित्या स्थापन करणे, विद्यापीठांना अनिवार्य होते. परंतु या नियमांच्या विरोधात विद्यापीठांनी नव्हे तर खुल्या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. या नियमांमुळे प्रत्यावर्ती भेदभाव होऊन आपल्याला लक्ष्य केले जाईल, अशी भीती त्यांनी व्यक्त करून प्रकरण सर्वोच्च न्यायालयात नेले. सर्वोच्च न्यायालयास या विद्यार्थ्यांवर होणाऱ्या संभाव्य प्रत्यावर्ती भेदभावाचे काल्पनिक चित्र योग्य वाटले आणि या नियमांना तात्पुरती स्थगिती दिली. भेदभाव केल्यास या नियमांतील तरतुदी लागू होणार, चौकशीत दोषी आढळल्यास कारवाई होणार. मग असा भेदभाव करत नसताना आणि या नियमांखाली एकही प्रकरण दाखल झालेले नसताना या खुल्या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना भीती कशाची वाटते? त्यांना भेदभाव करण्याचा मुक्त परवाना हवा, असा अर्थ कोणी काढल्यास ते चुकीचे कसे ठरेल?

वास्तविक पाहता जातिभेद, अस्पृश्यता हे सारे इथल्या ब्राह्मणवादी व्यवस्थेने एका मोठ्या वर्गावर हजारो वर्षांपासून लादले आणि त्याला धार्मिक अधिष्ठान देऊन या वर्गास कायम गुलामगिरीत ठेवले. हा कलंक धुवून काढण्याची संपूर्ण जबाबदारी समाजाची, धर्माची असून सुद्धा समाजाने, धर्माने ती झटकून सरकारवर टाकली. त्यासाठी सरकार जे जे उपाय योजते त्यात खोडा घालण्याचे काम समाजाने, धमार्ने, विशेषतः शोषक वर्गाने केले. ही अमानवी प्रथा आपल्याकडे आहे याचा पश्चात्ताप तर नाहीच. उलट, जातिभेद आपल्याकडे अस्तित्वातच नव्हता, तो ब्रिटिशांनी आणला, असा शोध काही कुडमुडे इतिहासकार लावीत आहेत.

जातिभेदाच्या विरोधातील कायद्यांना किंवा उपायांना विरोध करीत आहेत. विशेष म्हणजे देशात हिंदुत्वाचा डंका वाजत असताना या जातिभेदाचे बळी हे हिंदूच ठरत आहेत. तरीही जातिभेद नष्ट व्हावा अशी पुसटशी इच्छाशक्ती या शोषकांमध्ये दिसत नाही.

धर्मबदलाचे त्रांगडे

तब्बल साडेतीन हजार वर्षांपासून जन्मावर आधारित जातिव्यवस्था या मातीत अस्तित्व टिकवून आहे. त्यावर समाजकारण चालते आणि राजकारणही. जातीवर आधारित आरक्षण ही सततच्या चर्चेतील बाब. धर्मांतर केल्यानंतर जातीचा दर्जा आणि आरक्षणाचे फायदे टिकून राहतात का, यावर सर्वोच्च न्यायालयाने नुकताच महत्त्वपूर्ण निकाल दिला. त्यानुसार अनुसूचित जातीच्या व्यक्तीने हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्मांव्यतिरिक्त इतर कोणताही धर्म (उदा. ख्रिश्चन, जैन, इस्लाम) स्वीकारला, तर तिचा अनुसूचित जातीचा दर्जा त्वरित संपुष्टात येतो. धर्मांतरित व्यक्तीला अनुसूचित जाती साठी असलेल्या आरक्षणाचे किंवा सरकारी सवलतींचे फायदे घेता येणार नाहीत. यासोबत अनुसूचित जाती आणि जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत मिळणारे कायदेशीर संरक्षणही मिळणार नाही. न्यायालयाच्या म्हणण्यानुसार ख्रिश्चन आणि अन्य काही धर्मांमध्ये जातिव्यवस्था मानली जात नाही. त्यामुळे धर्मांतरानंतर जुन्या धमार्तील जातीची ओळख आणि घटनात्मक फायदे मिळण्याचे काहीही कारण नाही. एका ख्रिश्चन धर्मगुरूने दाखल केलेल्या याचिकेवर हा निकाल दिला गेला. थोडक्यात, राज्यघटनेच्या (अनुसूचित जाती आदेश, १९५०) कलम ३ नुसार एखादी व्यक्ती नमूद केलेल्या धर्माव्यतिरिक्त इतर धर्माचे पालन करत असेल आणि दुसरीकडे पूर्वीच्या धर

उन्हाळ्यात केसांना अधिक चमकदार ठेवतील या '५' टीप्स



उन्हाळ्याच्या दिवसांत घामामुळे डोक्याला खाज येणं, केसात कोंडा वाढणं हा त्रास हमखास आढळतो. उन्हाळ्यात त्वचेची, आरोग्याची काळजी घेतली जाते. पण केसांकडे फारसे लक्ष दिले जात नाही. परिणामी अनेक छुपे त्रास किंवा त्वचा विकार वाढण्याची शक्यता असते. म्हणूनच शुष्क आणि फ्रिझी केसांची नेमकी काळजी कशी घ्यावी दिलेला हा सल्ला नक्की जाणून घ्या.

उन्हाळ्याच्या दिवसात वातावरणातील उष्णता आणि आर्द्रता यामध्ये बदल होत असल्याने केस अधिक शुष्क होतात. उन्हाळ्याच्या दिवसात घाम येण्याचं प्रमाण अधिक वाढतं. त्यामुळे टाळूजवळील त्वचा अधिक चिकट होते. त्याचा परिणाम केसांवरही जाणवतो.

▮उन्हाळ्याच्या दिवसात किमान २-३ वेळा केस स्वच्छ धुवावेत. नियमित केस धुणे शक्य नसेल तर एक आड एक दिवस केस स्वच्छ धुवावेत. यामुळे केस चिकट होणार नाहीत.



▮केस धुण्यासाठी माईल्ड किंवा हर्बल शाम्पू वापरा. केमिकलयुक्त शाम्पूमुळे केसांचे अधिक नुकसान होते. तुम्हांला डॅण्डरफचा त्रास असेल तर ॲण्टी डॅण्डरफ शाम्पू वापरा.

▮शाम्पूने केस धुतल्यानंतर चांगल्या दर्जाचे कंडिशनरही वापरा. टाळूवर कंडिशनर लावू नका. शक्य असेल तर लिव इन कंडिशनर वापरा. यामुळे सूर्याच्या प्रखर किरणांप्रमाणेच प्रदूषणामुळे केसांचे होणारे नुकसान टाळण्यासही मदत होते.

▮उन्हाळ्याच्या दिवसात केसांची चमक आणि पोत सुधारण्यासाठी ॲप्पल सायडर व्हिनेगर फायदेशीर ठरते. या घरगुती उपायासाठी दोन टीस्पून ॲप्पल सायडर व्हिनेगर एक लिटर पाण्यामध्ये मिसळा. केस शाम्पूने धुतल्यानंतर केस या पाण्यानेही स्वच्छ धुवा.

▮तुमचे केस मोकळे सोडणार असाल तर सनस्क्रीनयुक्त हेअर कंडिशनर आणि सेरम वापरा. यामुळे घामाने केस चिकचिकीत होण्याची शक्यता कमी होते. यामुळे केस रफ आणि विस्कटलेले दिसण्याची शक्यता कमी होते.



बद्धकोष्ठ दूर करण्याकरिता प्या मूग आणि पालकाचे सूप

आपल्या भोजनाच्या सवयी, आपला आहार आणि आपल्या शरीराला दिवसभरामध्ये होत असणारा व्यायाम, हालचाल, या गोष्टींवर आपण खात असलेल्या अन्नाचे पचन मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. जर पचनक्रिया सुरळीत नसेल, तर अपचन, बद्धकोष्ठासारख्या समस्या उद्भवतात. जर तुम्हालाही या समस्यांना वारंवार तोंड द्यावे लागत असेल, तर आहारामध्ये थोडा फार बदल करण्याची आवश्यकता आहे असे समजण्यास हरकत नाही. जर बद्धकोष्ठाचा त्रास होत असेल, तर आपल्या आहारामध्ये मुख्यत्वे फायबरची मात्रा जास्त असलेल्या पदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे. याच अंतर्गत आणि सध्याच्या थंडीच्या मोसमामध्ये सर्वांना नक्कीच आवडेल अश्या मूग आणि पालक सूपचा समावेश आहारामध्ये करता येईल. हे सूप पचण्यास कठीण नसून, यामध्ये शरीरासाठी आवश्यक सर्व पोषक तत्वे आहेतच, त्याच्याच जोडीने पचनासाठी आवश्यक फायबरही या सूपद्वारे शरीराला मिळू शकते. हे सूप बनवण्यासाठी एक कप हिरवे मूग पाण्यामध्ये रात्रभर भिजत घालून ठेवावेत. दुसऱ्या दिवशी सकाळी मूग पाण्यातून उपसून स्वच्छ धुवून घ्यावेत आणि प्रेशर कुकरमध्ये मऊ शिजवून घ्यावेत. एका भांड्यामध्ये थोडेसे तेल किंव साजूक तूप घालून त्यामध्ये एक चिरलेला कांदा, पालकाची पाने (दीड कप), थोडे आले, लसूणाच्या पाच सहा पाकळ्या, हळद आणि पाव चमचा कुटून घेतलेले धणे घालवेत. त्यानंतर यामध्ये आवडत असल्यास गाजराचे तुकडे, फ्लॉवरचे तुकडे, आणि थोडासा पुदिना घालून चांगले परतावे. भाज्या चांगल्या शिजल्या की शिजवून घेतलेले मूग यामध्ये घालून चांगले परतावेत. त्यानंतर गॅस बंद करून हे मिश्रण थंड होऊ द्यावे. मिश्रण थंड झाल्यानंतर थोडेसे पाणी घालून हे मिश्रण मिक्सरवर बारीक वाटून घ्यावे व चाळणीतून किंवा मोठ्या गाळणीतून गाळून घेऊन भाज्यांचा चोथा वेगळा करावा. गाळून घेतलेल्या मिश्रणामध्ये आवश्यक तेवढे पाणी घालून चवीपुरते मीठ आणि काळ्या मिऱ्याची पूड घालावी. सूपला चांगली उकळी आल्यानंतर गॅस बंद करावा. मूग आणि पालक यांमध्ये फायबरची मात्र जास्त असून, मूगामध्ये पोटॅशियमदेखील मुबलक प्रमाणात असते.



बिटाच्या अतिसेवनाने होऊ शकतात दुष्परिणाम

बीट ही भाजी शरीराच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय चांगली समजली जाते. पण आरोग्याच्या दृष्टीने एखादा पदार्थ कितीही चांगला असला, तरी त्याच्या अतिसेवनाने दुष्परिणाम उद्भवू शकतात. बिटाच्या अतिसेवनाने देखील शरीरावर काही दुष्परिणाम दिसून येण्याची शक्यता असते. हे दुष्परिणाम कोणते आहेत, ते जाणून घेऊ या. बिटाच्या अतिसेवनाने 'गाऊट' किंवा किडनी स्टोन्स सारख्या समस्या उद्भवण्याची शक्यता असते. तसेच बिटाच्या रसाच्या अतिसेवनाने शरीरामध्ये लोह, कॉपर, मॅग्नेशियम, लिव्हरमध्ये साठत राहून त्यामुळेही समस्या उद्भवू शकतात.

बिटाच्या अतिसेवनामुळे 'बीट-युरिया' दिसून येण्याची शक्यता असते. लघवीचा सामान्य रंग बदलून तो बिटाप्रमाणे लालसर होणे हे बीट-युरियाचे लक्षण आहे. तसेच ज्या व्यक्तीच्या शरीरामध्ये लोहाची कमतरता असेल, त्यांच्या बाबतीत ही समस्या अधिक उद्भवते. ही समस्या फारशी गंभीर नसली, तरी यासाठी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. बिटामध्ये 'ऑक्सलेट' मुबलक मात्रेमध्ये असून यांच्या अतिसेवनाने किडनी स्टोन्स होण्याची शक्यता असते. म्हणून ज्या व्यक्तींमध्ये आधीपासूनच किडनी स्टोन्सची समस्या असते, त्यांना बीट आहारातून कमी करण्याचा सल्ला दिला जातो. तसेच ज्यांना 'गाऊट' हा विकार असेल, त्यांनाही बीट आहारातून वर्ज्य करण्याचा सल्ला दिला जातो. बिटाच्या अतिसेवनाचे आणखी एक लक्षण म्हणजे शरीरावर येणारे बारीक पुरळ. हे लक्षण सामान्य नसून, अतिशय अभावानेच आढळते. बिटाच्या अतिसेवनाने अंगावर बारीक पुरळ उठणे, शरीरावर लालसर चट्टे उठणे, खाज सुटणे, आणि क्वचित थंडी वाजून ताप येणे अशी लक्षणेही पाहिली गेली आहेत. त्याचप्रमाणे बिटाचे सेवन केल्यानंतर आवाज बसण्याची समस्या दुर्मिळ असली, तरी पाहिली गेली आहे. बिटाच्या अतिसेवनाने पोटामध्ये गॅसेस होऊन पोटदुखी उद्भवू शकते. तसेच पोट फुगणे, बद्धकोष्ठ याही समस्या बिटाच्या अतिसेवनाने उद्भवू शकतात.

व्यायामासाठी वापरण्यात येणाऱ्या कपड्यांमधून घामाची दुर्गंधी अशी करा दूर

व्यायाम करीत असताना पुष्कळ घाम येत असतो. अंगावरील कपड्यांमध्ये हा घाम शोषून घेतला जात असतो. अंगावरील कपडे घामाने ओले झाले असता, त्यामध्ये व्यायाम सुरू ठेवणे अडचणीचे होऊ लागते. ही अडचण दूर करीत व्यायाम करताना घाम शोषून घेण्यासाठी आणि चटकन वाळण्यासाठी आजकाल 'ड्राय फिट' पद्धतीचे कपडे खास व्यायामप्रेमी मंडळींसाठी तयार करण्यात येत असतात. व्यायाम करताना वापरण्यात येणाऱ्या कपड्यांमुळे शरीरावरील घाम जरी शोषून घेतला जात असला, तरी अनेकदा या कपड्यांमधील घामाची दुर्गंधी मात्र कपडे धुतल्यानंतरही हटत नाही. ही दुर्गंधी दूर करण्यासाठी काही उपायांचा अवलंब करता येऊ शकेल.

आजकाल व्यायामासाठी खास बनवण्यात येणाऱ्या कपड्यांमध्ये अतिशय सूक्ष्म छिद्रे असतात. पण शरीरावरील घाम, बाहेरील वातावरणातील प्रदूषण, किंवा धुळीचे कण, त्वचेचा तेलकटपणा, कपडे धुण्यासाठी वापरण्यात येणारे डिटर्जंट इत्यादी कपड्यातून व्यवस्थित साफ न झाल्याने याचे कण या सूक्ष्म छिद्रांमध्ये अडकून राहतात आणि त्यामुळे कपडा धुतल्यानंतर त्यातून विशिष्ट दुर्गंधी येत राहते. ही दुर्गंधी हटवण्यासाठी सर्वप्रथम व्यायाम करून झाल्यानंतर जर कपडे घामाने थोडेच ओले झाले असतील, तर हे कपडे आधी हवेवर चांगले वाळू द्यावेत. कपडे धुण्यासाठी अधिक साबण वापरला तर कपडे अधिक स्वच्छ होतात हा गैरसमज आहे. वास्तविक प्रत्येक पद्धतीचा कपडा ठरावीक साबणाच्या मात्रेने स्वच्छ होणारा असतो. तसेच कपडे धुण्यासाठी वॉशिंग मशीनमध्ये देखील ठरावीक प्रमाणातच साबण वापरला जाणे आवश्यक असते. त्यामुळे यापेक्षा अधिक साबण वापरला गेल्यास कपडे खळबळून धुवूनही हा साबण त्यातून पूर्णपणे निघत नाही. कपड्यातील साबण पूर्णपणे काढून न टाकताच कपडा वाळवला गेला तर यामुळेही कपड्यामध्ये दुर्गंधी येऊ लागते. त्यामुळे साबणाचा आवश्यक तितकाच वापर केला जाणे आवश्यक आहे.




व्यायामाचे कपडे धुण्यासाठी 'फॅब्रिक सॉफनर'चा वापर करू नये. कपडे साबणाने धुतल्यानंतर ते न आकसता मुलायम आणि सुगंधी राहावेत याकरिता फॅब्रिक सॉफनरचा वापर करण्यात येतो. पण याचा वापर व्यायामासाठी वापरण्यात येणाऱ्या कपड्यांसाठी केला असता, यामुळे कपड्यावरील सूक्ष्म छिद्रे बुजण्याची शक्यता असते. जर ही छिद्रे बुजली, तर कपडा स्वच्छ होत नाही आणि त्यातून दुर्गंधी येऊ लागते. त्याचप्रमाणे सॉफनरच्या वापराने कपड्याचा आकार आणि फिट बिघडण्याची देखील शक्यता असते. जर व्यायामाचे कपडे घामाने भिजून खूपच ओले झाले असतील तर मात्र हे कपडे हवेवर वाळू न देता त्वरित धुणे योग्य ठरते. कपडे धुण्यापूर्वी ते उलटे करावेत, यामुळे तुमच्या त्वचेच्या संपर्कात आलेला कपड्याचा भाग व्यवस्थित धुतला जातो. व्यायामाचे कपडे शक्यतो इतर कपड्यांच्या जोडीने धुणे टाळावे. तसेच हे कपडे धुताना पाण्यामध्ये थोडे व्हिनेगर घालून कपडे धुवावेत. व्हिनेगरमुळे कपड्यांमधील दुर्गंधी पूर्णपणे दूर होते. व्हिनेरगरचा वापर करायचा असल्यास आधी एका बादलीमध्ये चार भाग पाणी आणि एक भाग व्हिनेगरमध्ये कपडे भिजवून ठेवावेत आणि मग नेहमीप्रमाणे धुवावेत. कपडे धुतल्यानंतर हवेशीर ठिकाणी वाळवावेत. त्यामुळे कपड्यामधील दुर्गंधी नाहीशी होईल.

कमी साहित्यात बनणारे ठेचा पनीर

या अप्रतिम मसालेदार ठेचा पनीर टिक्काने तुमच्या पाटीचीं रंगत वाढवा. ठेचा ही एक पारंपरिक महाराष्ट्रीयन चटणी आहे, जी सहसा ज्वारीची भाकरी, बाजरीची रोटी, थालीपीठ, चपाती इत्यादींसारख्या भारतीय पोळी-भाकरीसोबत दिली जाते. स्थानिक भाषेत याला हिरवी मिरची ठेचा असेही म्हणतात. ही मसालेदार आणि आंबट चटणी ताज्या हिरव्या मिरच्या, लसूण, देठांसकट कोथिंबीर आणि शेंगदाणे वापरून तयार केली जाते.

साहित्य : कपनीर- २५० ग्रॅम, हिरव्या मिरच्या- १०-१२, लसणाच्या पाकळ्या- ८-१०, शेंगदाणे- दोन मोठे चमचे, तेल- दोन मोठे चमचा, अर्ध्या लिंबाचा रस, मीठ, कोथिंबीर

पाककृती : पनीरचे लहान चौकोनी तुकडे करून घ्या. पॅनमध्ये एक चमचा तेल टाकून त्यात पनीरचे तुकडे शॅलो फ्राय करून बाजूला ठेवा. त्याच पॅनमध्ये थोडं तेल घाला. त्यात शेंगदाणे, मिरच्या, लसूण परतून घ्या. सर्व थंड झाले की मिक्सरमध्ये थोडी कोथिंबीर घालून जाडसर वाटण करून घ्या. आता कढईत पुन्हा थोडे तेल गरम करून तयार केलेला ठेचा घाला. एक मिनिट परतल्यावर त्यात पनीरचे तुकडे घालून परतून घ्या. मसाला सर्व पनीरच्या तुकड्यांना लागल्यावर मीठ आणि लिंबाचा रस घाला. शेवटी ५-१० मिनिटे परतून घ्या. आणि बारीक चिरलेली कोथिंबीर घाला. तुमचे गरमागरम ठेचा पनीर तयार आहे.



या '3' घरगुती फ्रूट मास्कने करा सनटॅनच्या समस्येला अलविदा!

उन्हात काळवंडलेली त्वचा पुन्हा तजेलदार करण्यासाठी ब्युटीपार्लरच्या ट्रीटमेंटपेक्षा करा हे घरगुती उपाय. वीकेंडला घरच्या घरी काही फळांच्या मदतीने त्वचा (exfoliate) मोकळी करून सौंदर्य खुलवण्यासाठी कॉस्मोलॉजिस्ट यांनी सुचवलेले हे काही उपाय नक्की अजामावून पाहा.



कलिंगड आणि काकडीचा मास्क

कलिंगडामध्ये पाण्याचा अंश अधिक असतो. त्यामुळे त्वचा मऊ आणि तजेलदार राहण्यास मदत होते. काकडीमध्ये पाणी मुबलक असल्याप्रमाणेच ब्लिचिंग क्षमताही आढळते. यामुळे टॅन कमी करण्यास आणि त्वचेचा रंग हलका करण्यास मदत होते.

कसा बनवाल

▮कलिंगड आणि काकडीचा पल्प एकत्र करा. तयार मिश्रण चेहऱ्यावर लावा.

▮१० मिनिटांनंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ करा.

पीच आणि टोमॅटोचा मास्क

पीचमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. यामुळे त्वचेचे पोषण होते. पीचमधील मॉईश्चरायझिंग घटक आणि टोमॅटोमधील क्लिन्जिंक करण्याचे गुणधर्म त्वचेला अधिक तजेलदार बनवते.

कसा कराल हा पॅक

▮एक पीच आणि टोमॅटो यांची एकत्र पेस्ट करावी.

▮यामध्ये एक चमचाभर मध मिसळा.

▮तयार मिश्रण चेहऱ्यावर लावावे. त्यानंतर अर्ध्या तासाने चेहरा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा.

▮अशा घरगुती मास्कचा नियमित आणि योग्य पद्धतीने वापर केल्यास त्वचा अधिक तजेलदार होण्यास मदत होते. टॅन काढण्यासोबतच सौंदर्य खुलवण्यास या मास्कचा उपयोग होतो.

ॲव्हॅकॅडो आणि पपई

ॲव्हॅकॅडोमध्ये व्हिटॅमिन ई घटक मुबलक असल्याने त्वचा आरोग्यदायी राहण्यास तसेच उजळण्यास मदत होते. पपई टॅन कमी करण्यास मदत करते. तसेच व्हिटॅमिन ए घटक त्वचेला पोषण देतात.

कसा बनवाल मास्क

▮एका मोठ्या वाटीमध्ये चार टीस्पून ॲव्हॅकॅडोची पेस्ट आणि पपईची पेस्ट मिसळा.

▮त्यामध्ये १ टीस्पून बदामाचे तेल आणि ३-४ थेंब ylang-ylang essential oil मिसळा.

▮या पॅकने चेहऱ्यावर आणि मानेवर मसाज करा. हा मास्क ५-१० मिनिटे ठेवा.

▮त्यानंतर थंड पाण्याने चेहरा स्वच्छ धुवा. थोड्या वेळाने चेहरा सुती कापडाने कोरडा करा. त्यानंतर चेहऱ्यावर मॉईश्चरायझर लावा.

▮हा उपाय नियमित करा.



केवळ स्वाद नव्हे तर गुणांनीही परिपूर्ण उसाचा रस

उन्हाळ्याची काहिली आता चांगलीच जाणवू लागली आहे आणि त्यामुळे साहजिकच लोकांची पावले आईस्क्रीम पार्लर, थंड पेये विकणाऱ्या दुकानांकडे वळू लागली आहेत. त्यातच उसाच्या गुऱ्हाळांनी म्हणजे रसवंतीगृहांनी त्यांचे संसार सुरू केले असून थंडगार, स्वादिष्ट आणि आले-लिंबू घालून केलेला गारेगार रस पिण्यासाठी गर्दी होऊ लागली आहे.

उसापासून मिळणारा हा नैसर्गिक रस केवळ स्वादिष्टच नाही तर आरोग्यासाठी खूपच फायदेशीर आहे. ॲंटीऑक्सिडंटनी समृद्ध असा हा रस रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारा आहे. आयर्न, मॅग्नेशियम, कॅल्शियम व अन्य इलेक्ट्रोलाईट्सचे प्रमाण या रसात पुरेसे असते, त्यामुळे डीहायड्रेशन झालेल्यांना रस पिणे फार उपयुक्त ठरते. सर्वसामान्य सर्दी आणि अन्य किरकोळ साथीचे आजार रोखण्यास रस पिणे फायद्याचे आहे तसेच ताप उतरवण्यासाठी सुद्धा रस पिण्याचा उपयोग होतो कारण उसाचा रस शरीरात प्रोटीनची पातळी वाढवितो. उसाच्या रसात कर्बोदके, प्रथिने, शिवाय आयर्न, पोटॅशियम अधिक मात्रेत असते यामुळे एक ग्लास उसाचा रस शरीरातील ऊर्जेची पातळी वाढवितो आणि शरीराचा थकवा दूर करतो. रक्तातील प्लाझ्मा आणि अन्य तरल पदार्थ वाढवितो. मूत्रपिंडाच्या विकारात म्हणजे किडनी स्टोनमध्ये रस पिणे फायद्याचे आहे. तसेच हा रस दात किडणे आणि श्वास दुर्गंधी रोखणारा आहे. यकृत म्हणजे लिव्हरला बळ देणारा असल्याने कावीळ झाल्यास उसाचा रस द्यावा, असे सांगितले जाते. आयुर्वेदानुसार उसाच्या रसाचे सेवन बद्धकोष्ठता दूर करणारे आहे आणि रसात असलेल्या क्षारांमुळे पित्त, पोटातील जळजळ दूर होते. उसाच्या रसात ए तसेच सर्व प्रकारची बी व्हिटॅमिन्स असतात, म्हणूनही उसाचा रस आरोग्यवर्धक ठरतो. फक्त रसवंतीगृहात रस पिताना उघड्यावरच बर्फ घालणे टाळावे तसेच रसवंतीगृहाची तेथील ग्लास, रस पिळणारे चरक यांची स्वच्छता आहे याची खात्री करून घ्यावी.



ग्रीन कॉफीदेखील आरोग्यासाठी लाभदायक

सकाळी उठल्यावर वाफाळत्या कॉफीचा कप कोणाला नकोसा असेल? विशेषतः थंडीमध्ये किंवा पावसाच्या दिवसांमध्ये कॉफी मिळाली की मोसमाचा आनंद आणखीनच वाढतो, आणि शरीराची मरगळ दूर होऊन शरीरामध्ये नवे चैतन्य येते. पण केवळ शरीराची मरगळ दूर करणे आणि शरीरामध्ये चैतन्य निर्माण करणे एवढ्यापुरताच कॉफीचा उपयोग नाही. कॉफीचे सेवन आपल्या आरोग्याच्या दृष्टीने देखील फायद्याचे ठरण्यासाठी ग्रीन टीप्रमाणेच ग्रीन कॉफीचे सेवन करणे गरजेचे आहे. कॉफीच्या बिया भाजण्याच्या आधी हिरव्या असतात. याच बियांपासून तयार केली गेलेली कॉफी आरोग्यासाठी उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. ही कॉफी आरोग्याच्या दृष्टीने कशाप्रकारे उपयोगी आहे हे जाणून घेऊ या.

ग्रीन कॉफीमध्ये कॅफीनचे प्रमाण कमी असते. तसेच यामध्ये असलेले क्लोरोजेनिक ॲसिड वजन घटविण्यास सहाय्यक आहे. या तत्त्वामुळे शरीराच्या चयापचय शक्तीला चालना मिळत असून, शरीरातील ब्लड शुगर लेव्हल नियंत्रित राहण्यास मदत होते. शरीरातील साठून राहिलेले ग्लुकोज आणि चरबीचे प्रमाण या कॉफीच्या सेवानाने कमी होऊ लागते. त्यामुळेच संतुलित आहार आणि नियमित व्यायाम यांच्या जोडीने ग्रीन कॉफीचे सेवन वजन घटविण्याच्या दृष्टीने फायद्याचे ठरते. क्लोरोजेनिक ॲसिडमध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असून यामध्ये सोडियमचे प्रमाण कमी असते. यामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते. त्याचप्रमाणे ग्रीन कॉफीच्या बिया कच्च्या आणि कोणत्याही प्रक्रिया केलेल्या नसल्यामुळे यांच्यामध्ये ॲंटी ऑक्सिडंट्सचे प्रमाण अधिक असते. म्हणूनच ग्रीन कॉफीच्या सेवनाने शरीरावर हानीकारक फ्री रॅडिकल्सचा प्रभाव कमी होतो. तसेच ग्रीन कॉफीमध्ये असणारे ॲसिड त्वचेला आर्द्रता प्रदान करणारे राहिडिक आहे.



पासवर्ड आठवतच नाहीये? काळजी नको, पासवर्डशिवाय अनलॉक करा मोबाईल, पाहा ट्रिक्स

सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रत्येकजण स्मार्टफोनला लॉक ठेवतो. फोनमध्ये अनेक वैयक्तिक आणि महत्त्वाच्या गोष्टी सेव्ह असतात. या गोष्टी कोणी पाहू नयेत, अशी युजर्सची इच्छा असते. यामुळेच मोबाईल लॉक करणे ही पर्यायापेक्षा गरज बनली आहे. पण जर तुम्ही तुमचा पासकोड विसरलात तर? तुमचा सर्व डेटा देखील करप्ट होऊ शकतो. विसरलेला पासकोड परत मिळवणे अनेकांसाठी कठीण असते. ही समस्या तुम्ही आधीच सोडवली तर बरे. आज आम्ही तुम्हाला अशा पद्धतीबद्दल सांगत आहोत, ज्याद्वारे तुम्ही पासवर्ड न टाकता तुमचा फोन अनलॉक करू शकता. परंतु, पिन किंवा पासवर्ड सेट करण्यापूर्वी तुम्हाला ही पद्धत करावी लागेल.

स्मार्ट लॉकसह अनलॉक करा : हे एक अँड्रॉईड फीचर आहे, जे तुम्हाला काही विशिष्ट परिस्थितींमध्ये लॉक स्क्रीन सुरक्षिततेला बायपास करण्याची परवानगी देते. यासाठी तुम्हाला सेटिंगमध्ये जाऊन सिक्युरिटीमध्ये जावे लागेल. यानंतर तुम्हाला स्मार्ट लॉकमध्ये जावे लागेल. तो तुमचा फोन लॉक लक्षात ठेवेल. पिन सेट करण्यापूर्वी हे करणे आवश्यक असेल.

ऑन-बॉडी डिटेक्शन : येथे तुम्हाला ऑन-बॉडी डिटेक्शनसह पासवर्डशिवाय तुमचे विद्यमान लॉक अनलॉक करण्यासाठी ५ पर्याय दिले



जातील. यामध्ये तुम्ही फोन हातात घेतला आहे की नाही हे फोनला कळेल. फोन तुमच्या हातात किंवा खिशात असल्यास फोन आपोआप अनलॉक होईल.

विश्वसनीय ठिकाणे : तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल असे स्थान तुम्ही निवडू शकता.

विश्वसनीय उपकरणे : विश्वासार्ह फिटनेस ट्रॅकर किंवा कारसारख्या अन्य ब्लूटूथ उपकरणाशी कनेक्ट केल्यावर तुमचा फोन आपोआप अनलॉक होईल.

विश्वासार्ह चेहरा : फोन अनलॉक करण्यासाठी फेशियल रेकग्निशन वापरा.

व्हॉइस मॅच : तुमचा फोन तुमचा आवाज ओळखताच, तो तुमचा फोन अनलॉक करेल. हे वैशिष्ट्य अँड्राइड ८ ओरियो नंतर बंद करण्यात आले होते परंतु ते अद्याप जुन्या उपकरणांवर काम करते.

मुंबई-पुणेदरम्यानचा रॉयल प्रवास

९६ वर्षांची 'दख्खनची राणी' नटली, सोफा सेट, वार्ली आर्ट अन्... डायनिंग डब्याचं नूतनीकरण

■ बातमी /लेख,प्रीती दिपक नाईक

मुंबई आणि पुणे दरम्यान धावणारी रेल्वेची शान, म्हणजेच 'डेक्कन क्वीन' (दख्खनची राणी), आता ९६ वर्षांची झाली असली तरी तिचे आकर्षण आजही कायम आहे. या ऐतिहासिक गाडीच्या प्रवाशांसाठी आता एक आनंदाची बातमी आहे. डेक्कन क्वीनला आता एका अत्यंत आधुनिक आणि आकर्षक अशा 'डायनिंग कार'ने (जेवणाचा डबा) सजवण्यात आले आहे. या नव्या डब्याचे खास वैशिष्ट्य म्हणजे त्यावर साकारण्यात आलेली 'वारली चित्रकला'. महाराष्ट्राची लोककला असलेल्या वारली पेंटिंग्जमुळे या डायनिंग कारला एक वेगळीच ओळख मिळाली आहे. यामुळे प्रवाशांना आता मुंबई-पुण्याच्या प्रवासात केवळ चमचमीत खाद्यपदार्थांचा आस्वादच घेता येणार नाही, तर डोळ्यांना सुखद वाटणाऱ्या पारंपरिक कलेचा अनुभवही घेता येईल. साडेतीन तासांचा हा प्रवास आता अधिक शाही आणि कलात्मक होणार आहे.

शुक्रवारपासून सेवा सुरू

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे आयोजित 'ट्रेन महोत्सव' कार्यक्रमादरम्यान या नव्या धाटणीतील डब्यासह ही गाडी दिमाखात पुण्याकडे रवाना झाली. गेल्या महिन्याभरापासून या डायनिंग कारच्या आधुनिकीकरणाचे काम सुरू होते, ज्यामुळे प्रवाशांची



तात्पुरती सोय करण्यासाठी पॅन्ट्री कार जोडण्यात आला होता. मध्य रेल्वेने प्रवाशांच्या सुविधेसाठी हाती घेतलेले हे नूतनीकरणाचे काम आता यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. विशेष म्हणजे, डायनिंग कारची सुविधा असलेली ही देशातील एकमेव गाडी असल्याने प्रवाशांमध्ये या नव्या सुविधेबाबत प्रचंड उत्सुकता आहे. आधुनिक सोयीसुविधांनी सज्ज झालेल्या या डब्यामुळे प्रवाशांचा साडेतीन तासांचा प्रवास आता अधिक सुखकर आणि चविष्ट होणार आहे. वातानुकूलित आणि विनावातानुकूलित डब्यांतील सर्व स्वच्छतागृहांना आकर्षक विनाइल लावून नव्या स्वरूपात सादर करण्यात आले आहे. वातानुकूलित डब्यातील आसनांना सीट कव्हर्स बसवण्यात आले. छत आणि पॅनल बोर्ड बदलून नव्या संकल्पनेवर डिझाइन देण्यात आल्यामुळे डब्यांतील सजावट प्रवाशांच्या कौतुकास पात्र ठरत आहे. एसी डब्यांमध्ये एअर फ्रेग्रन्स डिस्पेंसर, स्वच्छतेसाठी टिश्यू पेपर डिस्पेंसर, साबण वितरक आणि ड्युरो वाइप मॅट्सची सुविधा सर्व स्वच्छतागृहांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.

डेक्कन क्वीन'च्या डायनिंग कारचा 'फाईव्ह स्टार' लूक

मुंबई-पुणे प्रवासाची शान असलेल्या 'डेक्कन क्वीन'च्या डायनिंग कारचा कायापालट झाला असून, आता प्रवाशांना विमानासारखा किंवा एखाद्या अलिशान हॉटेलसारखा अनुभव रेल्वेमध्ये घेता येणार आहे. या डब्यातील जुन्या खुर्च्यांच्या जागी आता आरामदायी सोफा पद्धतीची आसन व्यवस्था करण्यात आली आहे. डब्यातील दिव्यांची रचना बदलून ती अत्यंत आकर्षक आणि 'लक्झरी' स्वरूपात केल्याने डब्याला एक वेगळीच झळाळी प्राप्त झाली आहे. डब्याच्या अंतर्गत भागावर महाराष्ट्राची ओळख असलेली 'वारली चित्रकला' विनाइल रॅपिंगच्या माध्यमातून साकारण्यात आली आहे. केवळ आधुनिकता नाही, तर इतिहासाची साक्ष देण्यासाठी या डब्यात सन १९३० मधील या एक्स्प्रेसचे काही दुर्मिळ आणि मनोवेधक फोटो लावण्यात आले आहेत. यामुळे प्रवाशांना चविष्ट जेवणासोबतच डेक्कन क्वीनच्या ९६ वर्षांच्या प्रवासातील जुन्या आठवणींना उजाळा देण्याची संधीही मिळणार आहे.

हायकोर्टाचे सरकारला खडे बोल

कुपोषणामुळे मृत्यूचे सत्र ही दुर्दैवी परिस्थिती



■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्रातील आदिवासी दुर्गम भागात कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूंच्या मुद्द्यावर मुंबई उच्च न्यायालयाने पुन्हा एकदा तीव्र नाराजी केली. न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठाने लहान मुले, गर्भवती महिला आणि स्तनदा मातांचे कुपोषणामुळे होणारे मृत्यू अजूनही सुरूच असून प्रगतिशील महाराष्ट्रात ही परिस्थिती दुर्दैवी असल्याचे खडे बोल सरकारला सुनावले. मेळघाटातील कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू रोखण्यात यावे, यासाठी सामाजिक कार्यकर्ते बंडू साने, डॉ. राजेंद्र बर्मा यांच्यासह डॉ. अभय बंग यांनी मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. या याचिकांवर न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

प्रभावी उपाययोजना करा

मेळघाट भागातील कुपोषण, कर्मचारी टंचाई, अपुरी वैद्यकीय सुविधा आणि वाढते बालमृत्यू याकडे लक्ष वेधतानाच कुपोषण, औषधांचा अभाव आणि योग्य वैद्यकीय सुविधांच्या कमतरतेमुळे मृत्यू होत असल्याबाबत आम्हाला २५ वर्षांनंतर आज सुनावणी घ्यावी लागते, हे दुर्दैव आहे, अशी खंत व्यक्त केली. यावर प्रभावी उपाययोजना राबवण्याचे आदेश देतानाच खंडपीठाने सुनावणी १५ एप्रिलपर्यंत तहकूब केली.

धोरणांची अंमलबजावणी करण्यात सरकार अपयशी

यावेळी खंडपीठाने गेल्या दोन दशकांपासून या संदर्भातील जनहित याचिका न्यायालयात सुरू असतानाही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली नाही. सरकारी धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे.

बारामतीच्या महिलेचा कर्नाटकात मर्डर

जोडीने निघाले होते गाणगापूरला, वाटेत नवऱ्यासोबत बिनसले अन्...



■बारामती। प्रतिनिधी,

बारामतीतून कर्नाटकला देवदर्शनासाठी निघालेल्या महिलेचा तिच्या पतीने खून केल्याची घटना समोर आली आहे. हे दोघे नवरा बायको देवदर्शनासाठी कर्नाटकातील कलबुर्गी जिल्ह्यात गेले होते. यावेळी जाताना दोघांमध्ये किरकोळ कारणावरुन वाद झाला.

या वादातून आरोपीने आपल्या बायकोचा गळा चिरत आणि तिला फोर व्हीलर खाली चिरडत तिची हत्या केली. या घटनेचा व्हिडिओदेखील सोशल मीडियात व्हायरल झाला आहे. अक्षय जाधव असे आरोपी पतीचे नाव असून, या हल्ल्यात शैला जाधव (28) या विवाहितेचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

या घटनेमुळे संपूर्ण परिसरात आणि सोशल मीडियावर संतापाची लाट उसळली आहे.

अंगावर गाडी घालून चिरडले

मिळालेल्या माहितीनुसार, जाधव दाम्पत्य कर्नाटकातील गाणगापूर येथे दर्शनासाठी जात होते. कलबुर्गी परिसरातून जात असताना त्यांच्यात कोणत्यातरी कारणावरून जोरदार भांडण झाले. हा वाद इतका विकोपाला गेला की, अक्षयने रागाच्या भरात शैला यांना कारमधून बाहेर ओढले आणि त्यांना बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्याने धारदार शस्त्राने स्वतःच्या पत्नीचा गळा चिरला आणि क्रूरतेचा कळस गाठत रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पत्नीच्या अंगावर गाडी घालून त्यांना चिरडले.

व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

या हृदयद्रावक घटनेचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, जेव्हा आरोपी आपली पत्नीवर जीवघेणा हल्ला करत होता आणि ती मदतीसाठी टाहो फोडत होती, तेव्हा तिथे उपस्थित असलेले नागरिक वाचवायला येण्याऐवजी या घटनेचे व्हिडिओ शूट करण्यात व्यस्त होते. बघ्यांच्या या असंवेदनशीलतेमुळे पीडितेला वेळीच मदत मिळू शकली नाही आणि तिचा जागीच मृत्यू झाला.

चारित्र्याच्या संशयावरुन हत्या?

कलबुर्गी पोलिसांनी या प्रकरणी वेगाने हालचाली करत आरोपी पती अक्षय जाधवला अटक केली आहे. अक्षयने पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन या हत्येचा कट रचला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. मूळचे बारामतीचे असलेले हे कुटुंब देवदर्शनासाठी गेले होते, मात्र त्याचे रूपांतर एका भीषण हत्येत झाले.

शेतात सापडले माजी सरपंचाच्या बायकोचे मुंडके, रेशन दुकानदारावर संशय, बॉडी अजूनही गायब

■मुंबई। प्रतिनिधी,

एका शेतात महिलेचे मुंडके सापडल्याने खळबळ उडाली आहे. शनिवारी (28 मार्च) सकाळी एका शेतात मोहरीच्या कापणीसाठी गेलेल्या मजुरांना हे मुंडके दिसले. या मुंडक्याजवळ सापडलेले केस आणि कपड्यांच्या आधारे महिलेची ओळख पटली आहे. चंद्रावती असे या मृत महिलेच्या पतीचे नाव असून ती गावच्या माजी सरपंचाची बायको आहे. मृत चंद्रावती गेल्या दोन महिन्यांपासून बेपत्ता होत्या. उत्तर प्रदेशातील शाहजहांपूर परिसरातील ही घटना आहे.



शेतात आढळली मानवी कवटी

मिळालेल्या माहितीनुसार, सेवाराम नावाच्या व्यक्तीच्या शेतात मोहरीचे पीक कापण्यासाठी मजूर गेले असता त्यांना तिथे मानवी कवटी दिसून आली. घाबरलेल्या मजुरांनी तातडीने ग्रामस्थांना याची माहिती दिली. माजी सरपंच रामनिवास वर्मा यांनी घटनास्थळी धाव घेत दावा केला की, कवटीचे दात आणि जवळ सापडलेले केस व ब्लाऊज हे त्यांच्या पत्नीचेच आहेत. त्यांनी स्थानिक रेशन दुकानदार मिट्ठूलाल याच्यावर हत्येचा गंभीर आरोप केला आहे.

रेशन दुकानदारावर गंभीर आरोप

रामनिवास यांनी पोलिसांना सांगितले की, 31 जानेवारी रोजी गावात एका कार्यक्रमात ढोलक वाजवण्यासाठी चंद्रावती गेल्या होत्या, तेव्हापासून त्या बेपत्ता होत्या. त्यांनी सुरुवातीला मिट्ठूलाल विरोधात अपहरण आणि दागिने व 50 हजार रुपये चोरल्याची तक्रार दिली होती. 20 फेब्रुवारी रोजी पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल केला होता, मात्र तपास पुढे सरकला नाही. या प्रकरणात राजकीय वैमनस्य असल्याचीही चर्चा असून, मिट्ठूलालने निवडणुकीत विरोधात काम केल्यामुळे दोन्ही कुटुंबांत वाद असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

डीएनए चाचणी करणार

दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून अद्याप शरीराचा उर्वरित भाग मिळालेला नाही. पोलिसांनी स्पष्ट केले की, हा सांगाडा चंद्रावती यांचाच आहे की नाही, हे तपासण्यासाठी रविवारी (29 मार्च) डीएनए नमुने पाठवण्यात येतील. डीएनए रिपोर्ट प्राप्त झाल्यानंतरच या प्रकरणातील पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल.

सुनेसोबतच्या वादाला वैतागली, सासूने सात महिन्यांच्या प्रेग्नंट सुनेला संपवले

कुदळीने सपासप वार करत हत्या

■भाईंदर। प्रतिनिधी,

माणुसकीला काळिमा फासणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका सासूनेच आपल्या सात महिन्यांच्या गरोदर सुनेची कुदळीने वार करून निर्घृण हत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करत अवघ्या काही दिवसांतच धक्कादायक खुलासा केला असून, आरोपी सासूला अटक करून तिची रवानगी तुरुंगात करण्यात आली आहे. मध्य प्रदेशातील पन्ना जिल्ह्यातील ही घटना आहे.

घरात रक्ताच्या थारोळ्यात महिला

या घटनेची सुरुवात 14 मार्च रोजी झाली. शिक्षक दयाराम साहू यांनी आपली पत्नी नीता साहू घरात रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध पडल्याची माहिती पोलिसांना दिली. नीताच्या डोक्यावर आणि चेहऱ्यावर गंभीर जखमांच्या खुणा होत्या. माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळ गाठले, मात्र तोपर्यंत नीताचा मृत्यू झाला होता. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी फॉरेन्सिक टीम आणि



श्वानपथकाला पाचारण केले. सुरुवातीला या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू करण्यात आला होता, मात्र पोस्ट मार्टम अहवालात नीताची हत्या झाल्याचे स्पष्ट झाले.

सासूने केला गुन्हा मान्य

पोलिसांनी या प्रकरणी सुरुवातीला अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला. तपासादरम्यान घरातील सदस्य आणि शेजाऱ्यांची कसून चौकशी करण्यात आली. पोलिसांना तपासात वारंवार मृताच्या सासूच्या वागणुकीवर संशय येत होता. मिळालेले पुरावे आणि सासूच्या विसंगत विधानांमुळे संशय बळावल्याने पोलिसांनी तिला ताब्यात घेऊन चौकशी केली. अखेर पोलिसी खाक्या दाखवताच सासूने आपला गुन्हा मान्य केला आणि या निर्घृण हत्येमागील सत्य बाहेर आले.

कुदळीने वार करुन हत्या

घरगुती वाद आणि सततच्या वादातून आलेल्या रागाच्या भरात आपण हे पाऊल उचलल्याचे आरोपी सासूने कबूल केले. सासूने सांगितले की, 'रागाच्या भरात तिने सुनेवर कुदळीने सपासप वार केले, ज्यामुळे तिचा जागीच मृत्यू झाला.' पोलिसांनी आरोपीच्या माहितीनुसार हत्येसाठी वापरलेली रक्ताने माखलेली कुदळ जप्त केली आहे. आरोपी सासूला न्यायालयात हजर केले असता, तिची रवानगी कारागृहात करण्यात आली आहे. एका गरोदर सुनेची तिच्याच सासूकडून झालेली ही हत्या पाहून संपूर्ण गावात हळहळ व्यक्त होत आहे.

नवजात बाळाला झुडुपात टाकले... भटक्या कुत्र्यांनी लचके तोडत रस्त्यावर आणले

■मुंबई। प्रतिनिधी,

माणूस किती क्रूर वागू शकतो याची अनेक उदाहरणे आपण बघत असतो. अशीच एक घटना समोर आली आहे. एका नवजात बालकाला रस्त्याशेजारील झुडुपात टाकून आई-बाप पळाले. त्या नुकत्याच जन्मलेल्या बाळाचं काय होईल याचा जराही विचार त्यांनी केला नाही. ते नवजात बाळ त्या झुडुपात पडलेलं असतानाच काही भटक्या कुत्र्यांनी त्याचे लचके तोडले. यामध्ये त्या बाळाचा मृत्यू झाला आहे. आज (28 मार्च) सकाळीच ही घटना घडली. हे आई-बाप कोण आणि ही घटना नेमकी कुठे घडली जाणून घेऊया.

बाळाचे आई-बाप कोण?

दरम्यान, हे बाळ नेमकं कुणाचं आहे याचा पोलिस शोध घेत आहेत. मात्र, माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या घटनेमुळं सर्वत्र खळबळ उडाली आहे. आपल्या बाळाला झुडुपात टाकणाऱ्या जन्मदात्या माता-पित्याला थोडीशीही दयामया वाटली नाही का असा सवाल आता विचारला जात आहे. जर बाळ नकोच होतं तर त्याला अनाथाश्रमात सोडून द्यायला हवं होतं अशा प्रतिक्रियाही लोक देत आहेत.

भटक्या कुत्र्यांनी तोडले लचके

उत्तर प्रदेशातील पीलीभीत मधील ही घटना आहे. येथील एका रस्त्याच्या शेजारी असलेल्या झुडुपात कोणीतरी नवजात बाळाला टाकून पळून गेले होते. रस्त्यावर भटकणाऱ्या कुत्र्यांना याचा सुगावा लागला आणि त्या या बाळाचे लचके तोडले. यापेक्षा भयानक म्हणजे या बाळाचे लचके तोडत-तोडत कुत्र्यांनी त्याला रस्त्यावर ओढत आणले होते. या ठिकाणी



जमलेल्या भटक्या कुत्र्यांची संख्या बघून रस्त्यावरुन ये-जा करणाऱ्या वाटसरुंना काहीतरी गडबड असल्याची शंका आली. त्यांनी जवळ जाऊन बघितले असता त्यांना जबरदस्त धक्का बसला. एक नवजात बाळ त्यांना याठिकाणी दिसले.

बघ्यांनी कुत्र्यांना हुसकावून लावले

यानंतर मोठ्या परिश्रमाने वाटसरुंनी या भटक्या कुत्र्यांना हुसकावून लावले आणि त्या नवजात बाळाची सुटका केली. याठिकाणी उपस्थित असलेल्या एका वाटसरुने सांगितले की, भटक्या कुत्र्यांनी तोडलेल्या लचक्यांमुळे त्या बाळाचा जीव गेला होता. यानंतर या बाळाला सरकारी दवाख्यान्यात हलवण्यात आले. मात्र त्याचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले. यानंतर मृत बाळाचे पोस्ट मार्टमदेखील करण्यात आले.

पिस्तूलचा धाक दाखवत 32 वर्षीय महिलेवर अत्याचार

धक्कादायक घटनेनं दौंड हादरलं, आरोपी पोलिसांच्या ताब्यात

■पुणे। प्रतिनिधी,

पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यात धक्कादायक घटना घडली आहे. कुरकुंभ परिसरात एका 32 वर्षीय महिलेवर जबरदस्तीने अत्याचार करण्यात आला आहे. यासंदर्भात दौंड पोलीस ठाण्यामध्ये पीडित महिलेच्या तक्रारीवरुन आरोपीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. 25 मार्च 2026 रोजी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास मुकादमवाडी कुरकुंभ हद्दीत हा संपूर्ण प्रकार घडला आहे. पिस्तूलचा धाक दाखवत महिलेवर अत्याचार करण्यात आल्याने खळबळ उडाली आहे.

आरोपीने संबंधित महिलेला लिफ्ट देण्याचा बहाना करुन पिस्तुलचा धाक दाखवला

आरोपीने संबंधित महिलेला लिफ्ट देण्याचा बहाना केला आणि त्यानंतर तिला पिस्तुलचा धाक दाखवत तिच्यावरती अत्याचार केल्याची तक्रार दौंड पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. दौंड पोलिसांनी खडकी येथील संशयित आरोपी अमोल साहेबराव काळे याला बेड्या ठोकल्या आहेत. या संपूर्ण प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस करत आहेत.

अल्पवयीन मुलीच्या मृत्यूनंतर समोर आला अत्याचाराचा प्रकार,अंबाजोगाई तालुक्यातील घटना

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यात धक्कादायक घटना समोर आली आहे. तालुक्यातील एका गावातील अवघ्या 2 वर्षाच्या मुलीचा 17 मार्च रोजी पाण्याच्या हौदात बुडून मृत्यू झाल्याने तिला रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. यावेळी तपासणी करत असताना तिच्यावर अत्याचार झाल्याचे डॉक्टरांनी कुटुंबीयांना सांगितले. परंतु कुटुंबीयांना याबाबत कोणतीही माहिती नव्हती, यानंतर अंबाजोगाई ग्रामीण पोलिसांनी केलेल्या तपासात धक्कादायक बाब समोर आली आहे. एका 15 वर्षीय मुलाने इंटरनेटवरील अश्लील व्हिडिओ पाहून या मुलीला आपल्या घरी नेत अत्याचार केल्याची तपासात समोर आले. यानंतर आता या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच अधिक तपास अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पिंक पथकाचे अधिकारी करत आहेत.

आजीसोबत देवळात आरतीला गेली, रात्री देवळातच रक्तबंबाळ अवस्थेत सापडली

तीन वर्षांच्या चिमुकलीसोबत काय झालं?

■मुंबई। प्रतिनिधी,

तीन वर्षांच्या चिमुरडीवर झालेल्या अमानुष अत्याचारामुळे संतापाची लाट उसळली आहे. मंगळवारी (24 मार्च) रात्री घडलेल्या या घटनेने माणुसकीला काळीमा फासला असून, गंभीर जखमी झालेल्या बालिकेवर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे स्थानिक ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून आरोपींना कठोर शिक्षा करण्याची मागणी होत आहे. बिहारच्या भदौर परिसरातील ही घटना आहे.

मंदिराच्या परिसरात जखमी अवस्थेत

मंगळवारी रात्री 10 च्या सुमारास ही चिमुरडी रक्ताने माखलेल्या अवस्थेत पुन्हा मंदिर परिसरात दिसून आली. तिची अवस्था पाहून स्थानिक नागरिक हादरून गेले. बालिकेच्या कपड्यांवर रक्ताचे डाग होते आणि ती बेशुद्ध अवस्थेत होती. नागरिकांनी तातडीने तिच्या कुटुंबीयांना आणि पोलिसांना पाचारण केले. बालिकेची गंभीर प्रकृती पाहता तिला प्राथमिक उपचारानंतर तातडीने पाटणा येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

गावात तणावाचे वातावरण

बुधवारी (25 मार्च) सकाळी फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी भेट देऊन नमुने गोळा केले आहेत. या प्रकरणावर भाष्य करताना पोलीस ठाण्याच्या प्रमुखांनी सांगितले की, सध्या तपास सुरू असून अहवाल आल्यानंतरच सर्व बाबी स्पष्ट होतील. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास युद्धपातळीवर सुरू केला आहे. या घटनेनंतर गावात तणावाचे वातावरण असून दोषींना तात्काळ अटक करण्याची मागणी ग्रामस्थ करत आहेत.

आरती करत असताना मुलगी बेपत्ता

मंगळवारी संध्याकाळी ही चिमुरडी आपल्या आजीसोबत गावातील दुर्गा मंदिरात आरतीसाठी गेली होती. आरती सुरू असताना आजीने तिला खाली उभे केले आणि त्या आरतीत मग्न झाल्या. मात्र, आरती संपल्यानंतर जेव्हा आजीने तिचा शोध घेतला, तेव्हा ती तिथे नव्हती. बराच वेळ शोध घेऊनही मुलगी न सापडल्याने हताश होऊन आजीने घरी धाव घेतली आणि कुटुंबीयांना याची माहिती दिली.



भंडाऱ्याच्या लाखांदुरात 11 वर्षीय चिमुरडीवर अत्याचार

तीन अल्पवयीन मुलींना चारचाकी वाहनातून जंगल परिसरात फिरायला नेल्यानंतर त्यातील एका 11 वर्षीय चिमुरडीवर वाहनातचं अत्याचार केल्याची घटना घडली आहे. यावेळी अन्य दोन मुलींना आरडाओरड केल्यास किंवा घटनेची माहिती कुणाला सांगितल्यास त्यांच्याच्यावरही अत्याचार करु आणि जीवनाशी ठार मारु अशी धमकी दिली. ही धक्कादायक घटना भंडारा जिल्ह्याच्या लाखांदूर तालुक्यातील एका गावात घडली. पीडितेच्या कुटुंबीयांना याची माहिती मिळाल्यानंतर लाखांदूर पोलिसात दाखल केलेल्या तक्रारीवरुन आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, पोलिसांच्या अटकेच्या कारवाईनं आरोपींनं गावातून पळ काढला होता. या आरोपीला लाखांदूर पोलिसांनी चंद्रपूरच्या मिंथुर इथून अटक केली आहे. प्रथम कुडेगावे (18) असं पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचं नावं आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com